follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २५ अंक २०५ सातारा बुधवार, दि. ३ एप्रिल २०२४ पाने ६ (सुप्रभात) किंमत ५/- रूपये


## पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महत्वाचा निर्णय घेतला असून, पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणी कार्यक्रमात बदल करण्यात आला आहे. नवी मुंबई पोलीस मुख्यालय येथे पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची शारीरिक चाचणी पार पडणार आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १९, २६ आणि २७ एप्रिल रोजी होणाऱ्या शारीरिक चाचणी कार्यक्रमात बदल करण्यात (पान २ वर)

# 'वंचित'चा मोठा निर्णय : पुण्यातून वसंत मोरेंना उमेदवारी तर बारामतीमध्ये सुप्रिया सुळेंना जाहीर पाठिंबा

**मुंबई : राज्यात महाविकास आघाडी आणि वंचितची जागावाटपाची चर्चा फिस्कटल्यानंतरही वंचित बहुजन आघाडीने मविआच्या काही उमेदवारांना मदत करण्याची भूमिका घेतली आहे. वंचित आघाडीनं पुण्यातून वसंत मोरेंना उमेदवारी जाहीर केली आहे तर बारामतीमध्ये शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांना पाठिंबा दिला आहे. बारामतीमध्ये आपण उमेदवार देत नसल्याचं स्पष्ट करत सुप्रिया सुळेंना पाठिंबा जाहीर केला आहे.**





वंचितकडून महाविकास आघाडीसोबत मैत्रिपूर्ण लढत होत असल्याचं चित्र सध्यातरी दिसतंय. कारण या आधीही वंचितकडून कोल्हापूरच्या शाहू महाराजांना आणि गडकरींचे विरोधक उमेदवार काँग्रेसचे विकास ठाकरे यांना पाठिंबा देण्यात आला आहे. त्यानंतर आता सुप्रिया सुळे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

वंचितने या आधी दोन याद्या जाहीर केल्या होत्या. आता तिसऱ्या यादीत नांदेडमधून अविनाश बोसिरकर, परभणीतून बाबासाहेब उगळे, छत्रपती संभाजीनगरमधून अफसर खान, पुण्यातून वसंत मोरे आणि शिरूरमधून मंगलदास बागूल यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

पुण्यातील धडाडीचे नेते अशी ओळख असलेल्या वसंत मोरे यांनी या आधी प्रकाश आंबेडकरांची भेट घेतली होती. त्याच दरम्यान प्रकाश आंबेडकरांनी मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे यांचीही भेट घेतली होती. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाज मोठ्या प्रमाणात नाराज असल्याचं दिसतंय. त्याचमुळे आता वंचितच्या वतीने वसंत मोरे यांना पुण्यातून उमेदवारी देण्यात आली आहे. त्या माध्यमातून पुणे आणि आजूबाजूच्या परिसरात मराठा मतं आकर्षित करण्याचा मानस असल्याचं दिसतंय.

वंचित बहुजन आघाडीने कोल्हापुरात उमेदवार न देता काँग्रेसचे शाहू महाराज यांना पाठिंबा जाहीर केला आहे. त्याचवेळी नागपुरात भाजपचे उमेदवार नितीन गडकरी यांच्या विरोधात निवडणूक लढणारे काँग्रेसचे विकास ठाकरे यांनाही पाठिंबा दिला आहे. त्यानंतर आता बारामतीमध्ये शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांना पाठिंबा दिला आहे.

### 'वंचित'चे आत्तापर्यंत जाहीर झालेले उमेदवार

- नांदेड – अविनाश बोसिरकर
- परभणी– बाबासाहेब उगळे
- छ. संभाजीनगर – अफसर खान
- पुणे – वसंत मोरे
- शिरूर – मंगलदास बागूल
- हिंगोली – डॉ. बी.डी. चव्हाण
- लातूर – नरिसिंहराव उदगीरकर
- सोलापूर – राहुल गायकवाड
- माढा – रमेश नागनाथ बारसकर
- सातारा – मारुती जानकर
- धुळे – अब्दुल रहमान
- हातकणंगले – दादासाहेब उर्फ दादागौडा चवगोंडा पाटीलरावेर – संजय पंडीत ब्राम्हणे
- जालना – प्रभाकर देवमन बकले
- मुंबई उत्तर मध्य – अबुल खान
- रत्नागिरी सिंधुदुर्ग – काका जोशी

# धोम धरणाच्या पाण्यात बुडून पिता-पुत्राचा मृत्यू

**राजदंड / वाई**

धोम धरणाच्या आसरे बोगदा कालव्याच्या पाण्यात बुडून पिता पुत्राचा मृत्यू झाला. आंबेदरा आसरे (ता वाई) येथे ही दुर्दैवी घटना घडली. उत्तम सहदेव ढवळे व अभिजीत उत्तम ढवळे अशी त्यांची नावे आहेत.

धोम धरणातून भोर खंडाळा फलटण तालुक्याला बलकवडी धरणाच्या आसरे गावाजवळच्या बोगद्यातून कालव्याद्वारे पाणी सोडण्यात येते. सध्या कालवा बंद आहे त्यामुळे येथे गेट टाकलेले आहे.त्यामुळे येथे पाणी साठलेले असते.या कालव्याच्या पाण्यात दुपारी पोहण्यासाठी उत्तम सहदेव ढवळे (वय ४५) व अभिजीत उत्तम ढवळे (वय १३) हे दोघे पितापुत्र गेले होते. यावेळी कालव्याच्या पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे दोघेही पाण्यात बुडाले.

लोकांनी आरडाओरडा केला. त्यांचा शोध घेतला मात्र ते मिळवून आले नाहीत. यानंतर महाबळेश्वर ट्रेकर्स, प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम व वाई आपदा ट्रेकर्स टीमच्या सुनील भाटिया यांना कळविण्यात आले. त्यांनी घटनास्थळी पाण्यात शोध मोहीम राबवली असता दोघांचेही मृतदेह सायंकाळी पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले. यावेळी या शोध मोहीमेतील सदस्य अशुतोष शिंदे (वाई) यांच्या डोक्याला बोगद्यातील लोखंडी बार लागून ते जखमी झाले. त्यांच्यावर वाई ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सायंकाळी दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी वाई येथे आणण्यात आले होते. या घटनेची नोंद वाई पोलिस ठाण्यात झाली आहे. उत्तम ढवळे हे शेतकरी असून त्यांचा चिकनचा व्यवसाय होता. तसेच ते पट्टीचे पोहणारेही होते. त्यांच्या मागे पत्नी आणि एक मुलगी असा परिवार आहे.

# लोकसभा निवडणुकीवर 'व्हिडीओ वॉच'

### जिल्हाधिकारी डुडी; आचारसंहिता पालनाचे आवाहन

**राजदंड / सातारा**

सातारा लोकसभा निवडणुकीत उमेदवारांचे अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया दि. १२ एप्रिलपासून सुरु होणार आहे. १९ एप्रिलला दुपारी तीन वाजेपर्यंत मुदत असणार आहे. या कालावधित १४ एप्रिलला रविवार असल्याने त्या दिवशी अर्ज दाखल करता येणार नाही. २२ एप्रिलला दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. ही सर्व प्रक्रियांवर सीसीटीव्ही तसेच व्हिडीओ शुटींच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाईल. सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली.

जिल्हाधिकारी डूडी यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी



आज पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले, उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानतर त्याची प्रिंट काढुन निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावी. जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज स्विकारले जाते. त्यासाठी उमेदवारांसह केवळ पाच जणांना अर्ज दाखल करण्यासाठीची परवानगी असणार आहे. उमेदवाराचे वय २५ वर्ष पूर्ण किंव्हा त्यापेक्षा अधिक असावे. उमेदवाराने अर्ज दाखल करण्यापूर्वी किमान एक दिवस तरी राष्ट्रीयीकृत बँकेत खाते काढावे. त्याच खात्यातून निवडणुकीसंदर्भातील खर्च करावेत. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना २५ हजार, तर अनुसुचित जाती, जमातीतील उमेदवारांना १५ हजार ५०० रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे. हे करताना त्यांना जातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

## अपघातात एकाचा मृत्यू

**सातारा :** बॉम्बे रेस्टॉरंट नजीक झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, साताऱ्यातील बॉम्बे रेस्टॉरंट येथे झालेल्या अपघातात दुचाकीस्वार सागर गंगाधर शिंदे (वय ३८, रा. विठ्ठलनगर, पुणे) यांचा मृत्यू झाला.

ही घटना ३० मार्च रोजी घडली असून याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

## विवाहितेचा जाचहाट प्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी तिघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, हेमंत परब, सुमन परब, तन्वी पाडी यांच्या विरुध्द शितल हेमंत परब (सध्या रा.सदरबझार, सातारा. मूळ सर्व रा.डोंबिवली, मुंबई) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. २०२० ते मार्च २०२४ या कालावधीत सासरच्या मंडळींनी मानसिक त्रास देवून छळ केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या पाठिंब्याने महाविकास आघाडीला आणखी बळ : नाना पटोले

**नागपूर/मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा रिपब्लिकन पक्ष बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनी देशभरात रुजविला त्या सर्व आंबेडकरी-पुरोगामी चळवळीतील सहकारी सोबत आल्याचा आनंद आहे. रिपब्लकिन पक्षाच्या पाठिंब्याने मविआ आघाडीला आणखी बळ मिळाले आहे. केंद्र सरकारचे अपयश जनतेसमोर उघडे करुन महाविकास आघाडी उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रचारात सहकार्य होणार असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.



नागपूर येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष प्रविण ऊर्फ बाळासाहेब खोब्रागडे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी खोब्रागडे यांनी अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाने महाविकास आघाडीला पाठिंबा दिल्याची घोषणा केली. ते पुढे म्हणाले की, भाजप प्रणित केंद्र सरकारने मागील दहा वर्षात जातीय तेढ निर्माण करून अराजकता पसरविण्याचे काम केले आहे. संविधानातील हक्क आणि अधिकार यांना पायदळी तुडवून लोकशाहीची थट्टा केली आहे. आरक्षण, रोजगार, महिला सुरक्षा हे सर्व मुद्दे दुर्लक्षित करण्यात आल्याने भाजपा सरकारला सत्तेतून पायउतार करायचे असेल तर सर्व धर्मनिरपेक्ष पुरोगामी शक्तींनी एकत्रित येऊन संविधान आणि लोकशाही अबाधित राहावी यासाठी एकत्रित लोकसभा निवडणुकीत प्रचार करणे गरजेचे आहे.

यावेळी अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार वझाहत मिर्झा, काँग्रेस प्रदेश सचिव विजय नळे, रिपब्लिकन पक्षाचे महासचिव घनश्याम फुसे, उपाध्यक्ष अशोक निमगडे, कोषाध्यक्ष प्रतीक डोर्लीकर, स्टूडंट फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. राजस खोब्रागडे, प्रदेश अध्यक्ष मिलिंद तायडे, केंद्रीय समिती सदस्य संजय पाटील, विशाल अलोने, सुरेश पानतावणे, गुलाब नंदेश्वर, प्रेमदास बोरकर, अनुप चिंचखेडे, चंद्रकांत दहिवळे, सिद्धार्थ पाटील आदी उपस्थित होते.

# नक्षलवादी आणि सुरक्षा दलामध्ये चकमक; ८ नक्षलवादी ठार

- गडचिरोली जिल्ह्यातील कोरचोली भागातील घटना

**राजदंड / गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातील कोरचोली भागात नक्षलवादी आणि सुरक्षा दलामध्ये झालेल्या चकमकीत आठ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नक्षलवादी मोठा घातपात करण्याची शक्यता वर्तवली जात होती. या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली आहे.



मंगळवारी सकाळी सहा वाजेपासून नक्षलवाद्यांसोबत जवानांची चकमक सुरू होती. या कारवाईत आठ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. तसेच या चकमकीत अनेक स्वयंचलित शस्त्रे जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# ट्रकच्या धडकेत ट्रॅक्टर ट्रॉलीमधील ४ ऊसतोड मजूर ठार, १० गंभीर जखमी

### कवठेमहांकाळ तालुक्यातील नागज फाटा येथे भीषण अपघात

**राजदंड / सांगली**

रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील कवठेमहांकाळ तालुक्यातील नागज फाटा येथे भीषण अपघातात चार ऊसतोड मजूर जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे. तर या अपघातामध्ये दहा ऊसतोड मजूर गंभीर जखमी झाले आहेत. हंगाम संपवून गावी निघालेल्या ऊसतोड मजुरांच्या टोळीवर मध्यरात्रीच्या सुमारास काळानं घाला घातला. मृतांमध्ये दोन महिला, एक मुलगा आणि मुलीचा समावेश आहे.



- मृतांमधील सर्वजण मंगळवेढा तालुक्यातील चिखलगी भुयार येथील रहिवाशी

शालन दत्तात्रय खांडेकर( वय ३० रा.जगमा), तम्मा हेगडे (वय ३५), दादा आप्पा ऐवळे (वय १७) आणि निलाबाई परशुराम ऐवळे (वय ३) अशी मृतांची नावे आहेत. मृतामधील सर्वजण हे सोलापूर जिल्ह्यातल्या मंगळवेढा तालुक्यातील चिखलगी भुयार येथील रहिवाशी आहेत. कोल्हापूरच्या शिरोळ तालुक्यातील दत्त साखर कारखान्याची ऊसतोडी संपवून हंगाम संपल्यानं सर्व जण ट्रॅक्टरमधून संसारसाहित्यासहित मंगळवेढा तालुक्यातील आपल्या गावी परत निघाले होते.

मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील नागज फाटा येथे ट्रॅक्टरमध्ये बिघाड झाला. त्यामुळे ट्रॅक्टर चालकाने गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. याचवेळी मागून भरधाव आलेल्या ट्रकनं ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. यामध्ये ट्रॅक्टरच्या आत बसलेल्या चौघा जणांचा जागीच मृत्यू झाला. तर ट्रॅक्टरमधील दहा जण गंभीर जखमी झाले. जखमींना कवठेमहांकाळ आणि मिरजेच्या शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. या घटनेमुळे ऊसतोड मजुरांच्या चिखलगी भुयार या गावावर शोककळा पसरली आहे.

ऊसतोडीचा हंगाम असल्यानं अनेक शेतमजुरांच्या टोळ्या ऊसतोडीसाठी जिल्ह्यात दाखल झाले आहेत. संसार चालविण्याकरिता ऊसतोड मजुरांना एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात स्थलांतर करावे लागते. अशावेळी संसारोपयोगी साहित्य घेऊन मजूर ट्रॅक्टर अथवा ट्रकमधून प्रवास करतात.

# ...अखेर सुनेत्रा पवारांच्या प्रचारासाठी शिवतारेंनी कंबर कसली!

### पुरंदरमध्ये महायुतीच्या समन्वय बैठकीचे आयोजन

**राजदंड / इंदापूर, पुणे**

विजय शिवतारेंनी माघार घेतल्यानंतर आता सुनेत्रा पवारांना जिंकून आणण्यासाठी शिवतारे कामाला लागले आहे. अजित पवारांवर विविध आरोप, पवार कुटुंबियांवर हल्लाबोल, बारामती लोकसभा लढवण्याचा निर्धार आणि त्यानंतर माघार हे सगळे झाल्यावर आता शिवतारे सुनेत्रा पवारांचा प्रचार करण्यासाठी मैदानात उतरले आहे.विजय शिवतारे यांच्या माघारीनंतर पुरंदरमध्ये महायुतीची समन्वय बैठक बोलवली आहे. पुरंदर विधानसभा मतदारसंघात आज महायुतीची समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

पुरंदर तालुक्यातील ढुमेवाडी येथे होणार बैठक होणार आहे. बारामतीच्या महायुतीच्या उमदवार सुनेत्रा पवारांच्या प्रचाराच्या




नियोजनासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आलं आहे. बैठकीला महायुतीचे आजी माजी आमदार आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. विजय शिवतारे मुंबईत असल्याने बैठकीला जाणार नाही आहेत मात्रत्यांचे कार्यकर्ते मात्र लावणार बैठकीला हजेरी लावणार आहेत आणि प्रचाराची रणणिती आखणार आहे.

विजय शिवतारेंनी बारामती लढण्याचा निर्धार केला होता. त्यानंतर अजित पवार , पवार कुटुंबियांवर आरोपांवर आरोप केले. मात्र त्यांनी निवडणूक लढवली असती तर सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळेंची अडचण वाढली असती. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांनी शिवतारेंना बोलवून घेतलं. त्यांना माघार घेण्यास सांगितली. त्यांची मनधरणी केली. त्यानंतर शिवतारेंनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर त्यांनी शब्द बदलले आणि सुनेत्रा वहिनींना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचा निर्धार केलेल्या विजय शिवतारेंनी अजित पवारांवर अनेक आरोप केले होते. त्यांच्यावर टोलेबाजी केली होती. इंदापूरची जनता अजित पवारांना साथ देणार नाही. मी जनतेचा कौल घेतला तेव्हा जनता त्यांच्या विरोधात आहे. त्यांना मतं पडणार नाही, असं म्हणत त्यांनी अजित पवारांवर निशाणा साधला होता. त्यासोबतच बारामतीचा सातबारा पवारांकडे नाही आणि अजित पवारांचा उर्मटपणादेखील अजून गेलेला नाही. त्यामुळे जनता अजित पवारांच्या विरोधात आहे, असा हल्लाबोल अजित पवारांवर केला होता. त्यानंतर अजित पवारांची बारामतीत डोकेदुखी वाढली होती. त्यानंतर लगेच मुख्यमंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्र्यांनी बैठकीसाठी बोलून घेतलं आणि शिवतारेंची समजूत काढली. तरीही शिवतारे कोणतीही भूमिका स्पष्ट करत नव्हते. मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीच्या एका फोनमुळे त्यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याचे सांगितले. मुख्यमंत्र्यांना अडचण होऊ नये, म्हणून माघार घेतल्याचे ते म्हणाले. आता माघार घेतल्यानंतर त्यांनी लगेच सुनेत्र पवारांना विजयी करण्याच्या घोषणा दिल्या होत्या.

# देशास आर्थिकदृष्ट्या परावलंबी करणाऱ्यांनीच आर्थिक स्वावलंबनाची भाषा बोलणे, ही देशाची कुचेष्टाच

### काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी

**राजदंड / पुणे**

देशाची सर्वाधिक संपत्ती खाजगी ऊद्योजक मित्रांच्या घशात घालणारेच् देश आर्थिक दृष्ट्या स्वावलंबनाची भाषा करतात हे केवळ हास्यास्पदच नव्हे तर कोडगे पणाचे लक्षण असल्साची प्रखर टिका काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली.

डॉ. मनमोहन सिंग यांचे युपीए १ व २ काळात, देशातील २६ कोटी जनता 'दारिद्र्य रेषे बाहेर' आली, ज्या २०१४ च्या काळात देशाची आर्थिक महासत्ता बनण्याकडे वाटचाल सुरु झाली होती.



ही सत्य वास्तवता असतांना, ७० वर्षात पहील्यांदा खाजगी ऊद्योगपतींचे उच्चांकी कर्ज माफ केले, ७० वर्षात प्रथम ऊच्चांकी बँक घोटाळे करून, देशास आर्थिक चुना लाऊन भाषणजीवींचा मित्र परिवार पसार झाला, ज्या 'मोदी सरकारच्या काळात' आरबीआय च्या 'गंगाजळीस पहील्यांदा नख लागले', कोट्यावधींच्या नोट बंदीच्या माध्यमातून 'अब्जावधींचा काळा पैसा सफेद होऊन' (ईति - सुप्रिम कोर्ट) देशाच्या अर्थ व्यवस्थेच्या पाठीत सुरा खुपसणारे व देशाशी प्रतारणा करणारे कुटील कृत्य केले. त्यांनी या विषयी बोलावे म्हणजे 'सौ चुहे खाकर बिल्ली चली हज को' म्हणी प्रमाणे आहे. या धादांत खोटे पणाची, निर्लज्ज राज्यकर्त्यांना थोडी ही नैतिक पातळींवर चाड वाटत नाही.

देशाच्या सार्वजनिक संपत्तीची लूट करणे, जनतेस महागाईच्या व बेरोजगारीच्या खाईत ढकलणे, देशातील तरुणांना रोजगारीच्या नावावर विदेशात गुलाम म्हणून जाऊ देणे या भयानक वास्तवास मोदी सरकार बगल देत असून, शिताफीने जाहिराती द्वारा सतत खोटा आभास निर्माण करण्याचा निंद्य प्रयत्न (पान २ वर)

# वसंतनगर येथील विकासकाने सोडले रस्त्यावर सांडपाणी

## नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर; कारवाईची मागणी

**राजदंड / सातारा**

खेड, ता. सातारा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वसंतनगर येथील स.नं. ७४ व ६९ या मधील रहदारीच्या मुख्य रस्त्यावर नजीकच्या अपार्टमेंटच्या विकासकांनी सांडपाणी निर्मुलनाची व्यवस्था न करता रस्त्यावर दुर्गंधीयुक्त पाणी सोडल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, विकासकांनी सांडपाणी निचऱ्याचे खोटे दाखले घेऊन अपार्टमेंट मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे, तर प्रत्यक्षात त्या ठिकाणी गटार नसताना खेड ग्रामपंचायतीने गटार असल्याचा दाखला दिला असल्याची माहिती नागरिकांनी दिली.

याबाबत वसंतनगर येथील नागरिकांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खेड, ता. सातारा ग्रामपंचायत हद्दीतील वसंतनगर येथील ग्रा.पं. रस्ता क्र. २३ व स.नं. ७४ व ६९ या मधील मुख्य रहदारीच्या रस्त्यावर नजीकच्या अपार्टमेंटचे बांधकाम करताना संबंधित विकासकांनी सांडपाणी निर्मुलनासाठी बंदिस्त गटाराची व्यवस्था न करता रस्त्यावर दुर्गंधीयुक्त पाणी सोडले आहे. याबाबत नागरिकांनी संबंधित अपार्टमेंटमधील सदनिकाधारकांना विचारणा केली असता सांडपाणी निर्मुलनाचा विषय विकासकाचा असल्याचे सांगण्यात आले. तर नागरिकांनी विकासकांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी संबंधित अपार्टमेंटमधील सदनिकांची विक्री केली आहे, त्यामुळे तो विषय आमचा नसल्याची उडवाउडवीची उत्तरे दिली. सद्या येथील रस्त्यावर खुलेआम सांडपाणी वाहत आहे. ठिकठिकाणी सांडपाण्याची तळी निर्माण झाली आहेत. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढला असून डेंग्यू, मलेरिया सारख्या रोगांना निमंत्रण मिळत आहे. याकडे कोणीही लक्ष देत नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

या निवेदनावर सुमारे १५ प्लॉटधारकांनी सह्या केल्या असून निवेदनाच्या प्रती तहसीलदार, नगररचनाकार, खेड ग्रामपंचायत यांना दिलेल्या आहेत.



**वसंतनगर येथील स.नं. ७४ चा प्लॉट नं. ३ येथे प्रत्यक्षात गटार नसताना खेड ग्रामपंचायतीने जागेच्या आराखडा मंजुरीसाठी गटार असल्याचा दाखला दिला आहे. तसेच विकासकांनी येथील जागेचा आराखडा मंजूर करतेवेळी खोटी प्रतिज्ञापत्र व दाखले दिले आहेत. आराखडा मंजूर करताना जागेची समक्ष पाहणी व सांडपाणी निर्मूलनाची व्यवस्था विकासकांनी केली आहे का, हे पाहूनच मंजुरी देणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्र व दाखले खोटी व बोगस असल्यास आराखडा मंजूर करु नये व संबंधित विकासकावर तात्काळ कारवाई करावी.**

**– नागरिक, वसंतनगर-खेड**

# बोलत नसल्याच्या रागातून ११ वीच्या विद्यार्थिनीवर कोयत्याने हल्ला

**राजदंड / पुणे**

पुण्यातील शुक्रवार पेठेमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. एकतर्फी प्रेमामधून तरुणीवर कोयत्याने हल्ल्याचा प्रयत्न झाला असून संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. सदर प्रकार घडल्यानंतर एका प्रत्यक्षदर्शी महिलेनं आरडाओरड केल्याने तरुणीचा जीव थोडक्यात वाचला. या महिलेमुळे सदाशिव पेठेत घडलेल्या हल्ल्याच्या घटनेची पूनरावृत्ती टळली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, ११ व्या इयत्तेमध्ये शिकत असलेल्या मुलीला भररस्त्यात आडवून तिच्यावर कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. ही मुलगी आरोपीशी बोलत नव्हती म्हणून तिच्यावर हल्ला करण्यात आल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी असलेल्या एका महिलेने आरडाओरड केल्याने बाईकवरुन आलेले दोन्ही आरोपी घटनास्थळावरुन पळून गेले. मुलीला कोयता फेकून मारण्याचा प्रयत्न केल्यानंतर आरोपी पडलेला कोयता उचलण्यासाठी बाईकवरुन उतरला. त्याने रस्त्यावर पडलेले कोयता उचलला. पण तितक्यात या बाईने आरडाओरड केला. लोक जमा होऊन आपण पकडले जाऊ या भीतीने आरोपीने घटनास्थळावरुन पळ काढला. या प्रकरणामध्ये खडक पोलीस ठाण्यामध्ये महेश सिद्धप्पा भंडारी आणि त्यांच्याबरोबर असलेल्या एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करुन घेण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महेश आणि संबंधित मुलगी एकमेकांना आधीपासून ओळखतात. ही मुलगी आणि तिच्या ३ मैत्रिणी दुपारी सुभाषनगर येथील गल्ली क्रमांक ६ मधून जात होत्या. त्याचवेळेस महेश आणि त्याचा मित्र बाईकवरुन तिथं आले. यावेळी महेश आणि या मुलीमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर त्याने हातातल्या कोयत्याने मुलीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

# दारू पिऊन गोंधळ; तीन युवकांवर गुन्हा

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र येरवडा संस्थेच्या परिसरात पडझड झालेल्या शासकीय निवासस्थानामध्ये दारु पिऊन गोंधळ घालून पळून गेल्याप्रकरणी तीन अनोळखी युवकांविरुद्ध प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मोनिका रंधवे यांनी दिली आहे.

पंडित जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र संस्थेला १ एप्रिल रोजी महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, उपायुक्त राहूल मोरे, विभागीय उपायुक्त संजय माने तसेच श्रीमती रंधवे यांनी भेट दिली. त्यावेळी संस्थेच्या बाजूला पडझड झालेल्या शासकीय निवासस्थानाची पाहणी करण्याकरिता गेले असता तेथे तीन अनोळखी युवक दारु पिऊन गोंधळ घालत असल्याचे आढळून आले. त्यांना विचारणा करण्यापूर्वीच ते पळून गेले. त्या अनुषंगाने संस्थेचे जमादार शिमोन साबळे यांनी येरवडा पोलीस ठाण्यात पोलीस तक्रार दिली आहे, असेही रंधवे यांनी कळविले आहे.

# अवैध गौण खनिज उपसाप्रकरणी ९ कोटी दंड वसूल

## गुंडागर्दी केल्यास सोडणार नाही - जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

**राजदंड / सातारा**

जिल्ह्यात काही प्रमाणात अवैध गौणखनिज उत्खनन सुरु होते. गत ७ ते आठ महिन्यांत २२४ कारवाई करत त्यातून ९ कोटींचा दंड वसूल केला आहे. अवैध कामांवर कारवाई करण्याचे काम महसूल, पोलीस, जिल्हा परिषदेसह सर्वच प्रशासनाने सुरु केले आहे. कोणी अवैध कामे करत असेल तर त्यांनी तत्काळ बंद करावीत. अशा कामांवर कारवाई करत असताना कोणी गुंडागर्दी करत शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांस त्रास दिला तर सोडणार नाही, असा इशाराच जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिला.

जिल्हाधिकारी डूडी यांनी आज अवैध गौणखनिज कारवाईची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घेतली. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी जीवन गलांडे, गौण खनिज अधिकारी थोरात आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डूडी म्हणाले, अवैध गौणखनिज उत्खनन, वाहतुकीवर महसूल प्रशासनाने कारवाई केली. २२४ कारवाया करताना १०० वाहनांना दंड करत ९ कोटींचा महसूल वसूल केला आहे. यामुळे यंदा वर्षीचा १०० टक्के महसूल वसुली उद्दिष्ठ पूर्ण झाले आहे. सातारा जिल्ह्यात २३४ क्रशर आहेत. त्यांची तपासणी केली असता ५७ क्रशर अनधिकृत असल्याचे समोर आले. त्यातील काही कागदपत्रे घेवून रितसर सुरु ठेवले आहेत. उर्वरीत ४३ अनधिकृत असून, ते बंद केले आहेत.

सातारा हा क्रांतीविरांचा तसेच शांतताप्रिय जिल्हा आहे. येथे गुंडागर्दी चालणार नाही. चुकीच्या कामांवर प्रशासन कारवाई करेलच. महसूल, पोलीस, जिल्हा परिषद तसेच अन्य शासकीय यंत्रणा नियमाप्रमाणे कारवाई करत असतात. त्यांच्यावर कोणी गुंडागर्दी करण्याचा प्रयत्न केल्यास तर त्यांना सोडणार नाही. कोठे चुकीचे काम सुरु असेल तर लोकांनी आमच्याशी संपर्क साधावा.

## पान १ वरून

### पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

आला आहे. त्यावेजी २९, ३० एप्रिल आणि २ मे रोजी या चाचण्या होणार आहेत. १५ ते १७ एप्रिल रोजी होर्णाया चाचण्यांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. लोकसभा निवडणुका १९ एप्रिल ते १ जून या दरम्यान सात टप्प्यात होत आहे. तर निकाल ४ जूनला जाहीर होतील. त्यामुळे या परीक्षांचं वेळापत्रक बदलण्यात आले आहे. याबाबत एमपीएससीकडून जाहीर करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, ''महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा-२०२२ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम दिनांक १५ ते २७ एप्रिल २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रम निश्चित करताना लोकसभा निवडणूकीतील मतदानाचे टप्पे विचारात घेऊन त्या-त्या टप्प्यातील उमेदवारांना अन्य दिवशी शारीरिक चाचणीसाठी बोलविण्यात आले होते. तथापि भारतीय निवडणूक आयोगाकडील प्राप्त निवेदने विचारात घेता दिनांक १९, २६ व २७ एप्रिल २०२४ रोजीच्या उमेदवारांची शारीरिक चाचणी अनुक्रमे दिनांक २९, ३० एप्रिल २०२४ व २ मे २०२४ या दिवशी पोलीस मुख्यालय नवी मुंबई येथे घेण्यात येणार आहे. शारीरिक चाचणीचा सुधारित सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल, असे एमपीएससीकडून सांगण्यात आले आहे.

### देशास आर्थिकदृष्ट्या परावलंबी करणाऱ्यांनीच आर्थिक स्वावलंबनाची भाषा बोलणे, ही देशाची कुचेष्टाच

करत आहे. नुकतेच भाषणजीवी प्रधान सेवकांनी एक भी भ्रष्टाचारी को छोडुंगा नही..(?) हे वक्तव्य केल्याचे जनतेने पाहीले असुन.. त्या सर्व भ्रष्टाचाऱ्यांना मोदी शहांच्या विकसीत भाजपचे लक्ष्य असल्याची प्रतिती देखील देशवासियांना रोज येत असल्याचे प्रतिपादन ही काँग्रेसने केले. कारण १० वर्षांत भ्रष्टाचाराचे आरोप करणारे दस्तूरखुद्द भाषणजीवी त्यांचे वर कारवाई करण्या ऐवजी, 'रेड कार्पेट' टाकत असल्याचेच दिसुन येत आहे..! धादांत खोटे बोलणे व दिशाभुल करणे हाच मोदी सरकारचा एकमेव अजेंडा असुन, 'लातों के भूत बातोंसे नही मानते' या उक्ती प्रमाणे, मोदी - शहांच्या प्रयोग - शाळेतील भ्रष्टाचारास राजमान्यता देणाऱ्या 'विकसीत भाजपला निवडणुक प्रक्रिये द्वारे धक्के मारुन सत्तेवरून खाली खेचणे आवश्यक असल्याचे आवाहन देखील गोपाळ तिवारी यांनी केले.

# विकसित भारताच्या उभारणीसाठी श्रमजीवींचे योगदान महत्त्वाचे

## मुरलीधर मोहोळ यांचे प्रतिपादन

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

शेतकरी, कामगार या दोन्ही घटकांना गेल्या पंच्याहत्तर वर्षात काँग्रेस सरकारने फारसे महत्व न देता कामगारांच्या संघटित ताकदीचा उपयोग फक्त सत्ता मिळवण्यासाठी केलेला बघायला मिळतो. अशा परिस्थितीत केंद्रात सत्तेत आल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्या पाच वर्षात जवानांनांसाठी, गेल्या पाच वर्षात शेतकरी, कामगार, श्रमजीवींसाठी निर्णय घेतले आहेत. त्यामुळे ही निवडणूक आपल्या सर्वांसाठीच महत्त्वाची आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी कामगार, श्रमजीवींचे योगदान महत्वाचे असल्याने त्यांनी आपल्या प्रगतीसाठी यावेळी मोदींना साथ द्यावी, असे आवाहन भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस-रिपब्लीकन पक्ष (आठवले गट) व मित्र पक्षांच्या महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी केले.

महायुतीचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचा प्रचाराचे नियोजन करण्यासाठी भाजपच्या कामगार आघाडीच्या वतीने मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे होते. कामगार आघाडीचे शहराध्यक्ष ओंकार कदम यांनी मेळाव्याचे आयोजन केले होते. शहर सरचिटणीस बापू मानकर, युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष निवेदिता एकबोटे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष करण मिसाळ, अनुप मोरे, नामदेव माळवदे,



बाळासाहेब टेंमकर, उमेश शहा आदी पदाधिकारी व मान्यवर मेळाव्याला उपस्थित होते.

'आपला देश तरूणांचा देश आहे. या युवा शक्तीच्या जोरावार विकसित भारताचे स्वप्न मोदीजींनी बघितले आहे, असे सांगून मोहोळ म्हणाले, 'विकसित भारतासाठी देशाने संघटित होणे गरजेचे आहे. देशातील कामगार शक्ती ही मोठी संघटित शक्ती असून या संघटन शक्तीच्या जोरावारच देशात औद्योगिक क्रांती कामगारांनी यशस्वी करून दाखवली आहे. आता बदलता काळ आणि विकसित होणारे तंत्रज्ञानाला श्रमांची जोड मिळणे गरजेचे आहे.

शहरध्यक्ष घाटे म्हणाले, 'ही निवडणूक प्रत्येक देशवासीयांचे आणि आपल्या घरातील भावी पिढीचे भवितव्य ठरवणारी असल्याने प्रत्येक देशवासियांच्या भविष्याच्या दृष्टीने ही निवडणूक महत्वाची आहे. त्यामुळे या निवडणुकीत होणारे मतदान हे कोणा उमेदवार किंवा पक्षासाठी होणार नाही, तर देशासाठी केलेले मतदान असणार आहे. स्वातंत्र्य लढ्यात जशी कामगार शक्तीने महत्वाची भूमिका बजावली होती, तशीच भूमिका बजावण्याची वेळ पुन्हा या निवडणुकीच्या निमित्ताने आलेली आहे. फरक फक्त इतकाच आहे की, यावेळी मतदानातून स्वातंत्र्याचे सुराज्यात रूपांतर करावयाची ही क्रांती आहे. त्यामुळे कामगारावर्गानेही मतदारांपर्यत पोचण्याची गरज आहे. ही जबाबदारी कामगारबंधू आनंदाने पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# दोन परप्रांतीयांकडून महिलेचा विनयभंग

**राजदंड / खंडाळा**

खंडाळा तालुक्यातील धावडवाडी या ठिकाणी एका महिलेसोबत असभ्य वर्तन करत तिचा विनयभंग केल्याप्रकरणी दोन परप्रांतीय युवकांवर खंडाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, धावडवाडी येथील एका ३० वर्षीय महिलेला संशयित आरोपी राजाराम वर्मा व जयराम प्रजापती (दोघेही सध्या रा.धावडवाडी मूळ रा. उत्तरप्रदेश) या दोघांनी असभ्य बोलून या महिलेसोबत लज्जास्पद वर्तन करीत विनयभंग केला. याबाबत पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून खंडाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# साखरीत आजपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**राजदंड / पाटण**

साखरी, ता. पाटण येथे बुधवार, दि. ३ ते दि. १० पर्यंत श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. यावर्षी सोहळ्यास ३६ वर्षे पूर्ण होणार आहेत. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पारायण सोहळा समितीमार्फत करण्यात आले आहे.

सप्ताहकाळात मारूती सुतार मेंढोशी, पांडूरंग सावंत मणेरी-साखरी, सुनिता सुतार चरण, वसंत सूर्यवंशी कोचरेवाडी, वैष्णवीताई पाटण, बालकुमारी आराध्या कदम, सदानंद महाराज कोतावडेवाडी यांची प्रवचने होणार आहेत. तर रघुनाथ महाराज धडामवाडी, आनंद शिर्के घोटकरण, जी. टॉकीज फेम समाज प्रबोधनकार सौ. नागेश्वरीताई झाडे, किशोर पाटील महामाज आळंदी, शिवचरित्रकाळ गौरीताई महाराज पंढरपूर, संगीता घारे घारेवाडी, सिध्दनाथ महाराज शामगावकर यांची कीर्तन सेवा होणार आहेत.

बुधवार दि. १० रोजी सचिन महाराज तामकणे यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्याचदिवशी दुपारी शशिकांत कदम टॅक्स कन्स्लटंट कराड यांचेमार्फत काल्याचा महाप्रसाद होणार आहे.

# सदरबझार येथे सुमारे दीड लाखांची घरफोडी

**राजदंड / सातारा**

साताऱ्यातील सदरबझार येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करुन १ लाख ६४ हजर ६३९ रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, चोरट्यांनी घरातून ३ तोळ्याच्या २ बांगड्या, मंगळसूत्र, सोन्याचा नेकलेस, मोत्याचा हार, लॅपटॉप, मनगटी घड्याळ असा चोरी झालेला मुद्देमाल आहे. याप्रकरणी विनीत श्रीधर पाटील (वय ४९, रा. सदरबझार, सातारा) यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

ही घटना दि. २४ ते २९ मार्च या दरम्यान घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# गोडोलीकरांचा सामाजिक उपक्रम इतिहास घडवेल - आ. शिवेंद्रसिंहराजे

## रक्तदात्यांचा सत्कार

**राजदंड / सातारा**

समस्त गोडोलीकर आणि येथील सामाजिक कार्यकर्ते रवी पवार गेली २५ वर्ष माझ्या वाढदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करतात. छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास सुरु असून कडक उपवास असतानाही रवी पवार यांनी रक्तदान केले. या रौप्यमहोत्सवी रक्तदान शिबिरात ८७ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. गोडोलीकरांचा हा सामाजिक उपक्रम इतिहास घडवेल, असे गौरवोद्गार आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी काढून सर्व रक्तदात्यांचे त्यांनी



आभार मानले.

आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या वाढदिनी गोडोली येथे रवी पवार यांच्या पुढाकारातून कर्तव्य सोशल ग्रुप, युवा मोरया सामाजिक संस्था आणि गोळीबार मैदान व गोडोली मित्रसमूह यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे हे २५ वे वर्ष असून रक्तदान केलेल्या रक्तदात्यांचा सत्कार आणि त्यांना प्रमाणपत्रांचे वाटप आ. शिवेंद्रसिंहराजे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी रवी पवार, शेखर मोरे- पाटील, व्यंकटराव मोरे, फिरोज पठाण, सुवर्णा पाटील, आनंदराव कणसे, बाळासाहेब खंदारे, अमोल मोहिते, अविनाश कदम, शरद काटकर, पूनम निकम, रुपाली घाडगे, मालती साळुंखे, रोहित खुस्पे, मोहित खुस्पे, अभि सुर्वे, अविनाश माने, सागर भोसले, हेमलता किरवे, आप्पा पिसाळ, सुनील मोरे, पोपट मोरे, चेतन जाधव, शहाजी जाधव, कांचन करांडे, रवी अहिरे, अक्षय मोरे, गौरव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबिरात ८७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रवी पवार यांनी सलग ५२ व्या वेळी रक्तदानाचे कर्तव्य बजवाले. या सर्वांचे आ. शिवेंद्रसिंहराजेंनी कौतुक करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. माझ्या वाढदिनी हा सामाजिक उपक्रम घेऊन गोडलीकरांनी एक आदर्श निर्माण केला असल्याचे आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले.

# नैराश्यातून युवतीची आत्महत्या

**राजदंड / सातारा**

लग्न ठरत नसल्याने आलेल्या नैराश्यातून सातारा तालुक्यातील भोंदवडे येथील युवतीने विष प्राशन करुन आत्महत्या केली असल्याचे समोर आले आहे.

याबाबत पोलिसांची माहिती अशी, पौर्णिमा चंद्रकांत शिंदे (वय २८, रा. भोंदवडे) असे आत्महत्या केलेल्या युवतीचे नाव आहे. याप्रकरणाची सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे. ही घटना दि. ३० मार्च रोजी घडली. युवतीने गवतावर फवारण्याचे औषध पिल्यानंतर उपचारासाठी तिला साताऱ्यातील रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला.


# गुढीपाडव्याच्या सोनेरी दिवसासाठी चंदूकाका सराफ ज्वेल्सकडून 'सोन्यावर सोनं फ्री' ऑफर!

**राजदंड / सातारा**

सुवर्ण खरेदीसाठी अत्यंत शुभ मानलेल्या गुढीपाडव्याचा मुहूर्ताला सोने खरेदीसाठी चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या शोरूमला अवश्य भेट द्या, याचे कारणही तसेच आहे. दि. ३ ते ८ एप्रिल, २०२४ या कालावधीत रू. ४९००० व पुढील सोने व हिऱ्यांच्या दागिन्यांच्या खरेदीवर 'सोन्यावर सोनं फ्री' ही ऑफर देण्यात येणार आहे, सोबतच ५०० चे गिफ्ट व्हाउचर हमखास भेट



मिळणार आहे. सदरची ऑफर चंदुकाका सराफ ज्वेल्सच्या महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील स्टोअर्समध्ये उपलब्ध आहे.

याशिवाय खास आकर्षण म्हणजे चंदुकाका सराफ ज्वेल्स यांचा उत्सव साडे तीन मुहूर्तांचा... एक असा उत्सव जिथे समृद्धी, संपन्नता हि गुढीपाडवा, अक्षय्यतृतिया, दसरा आणि दिवाळी-पाडवा या साडेतीन मुहूर्तांवर विशेष साजरी केली जाते.

यंदाच्या वर्षी येणाऱ्या साडे तीन मुहूर्तांसाठी आणि सणा-सुदीसाठी चला तर मग आपणही आपला सहभाग दाखवूया, ह्या मध्ये तुम्हाला सोन्याच्या व हिऱ्यांच्या अप्रतिम दागिन्यांचे नव-नवीन कलेक्शन पाहायला व खरेदी करायला मिळतील. त्यामुळे गुढी पाडव्याचा मुहूर्त खऱ्या अर्थाने सोनेरी करायचा असेल तर चंदुकाका सराफ ज्वेल्स च्या शोरूमला अवश्य भेट द्या असे आवाहन तसेच नव्याने फिनिक्स मॉल, वाकड, पुणे येथे सुरु होणाऱ्या शाखेच्या उद्घाटनाचे आमंत्रणही चंदुकाका सराफ ज्वेल्सचे संचालक श्री. सिद्धार्थ शहा यांनी दिले आहे.


### महापारेषणच्या उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मर बदलण्यासाठी

# मुळशीमधील काही गावांचा वीजपुरवठा बंद राहणार

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

महापारेषण कंपनीच्या पिरंगुट २२०/२२ केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातील ५० एमव्हीए क्षमतेचा नादुरुस्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बदलण्याचे काम बुधवार (दि. ३) ते शनिवार (दि. ६) पर्यंत होणार आहे. या चार दिवसांच्या कालावधीत विजेच्या भारव्यवस्थापनासाठी महावितरणच्या काही २२ केव्ही वाहिन्यांचा वीजपुरवठा सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत बंद ठेवावा लागणार असल्याने मुळशी तालुक्यातील काही गावांमध्ये चक्राकार पद्धतीने भारनियमन करण्यात येणार आहे.

यामध्ये बुधवारी, दि. ३ एप्रिलला महावितरणच्या २२ केव्हीच्या सहा वाहिन्यांचा वीजपुरवठा बंद राहील. त्यामुळे रिहे, भरे, घोटावडे, मुळखेड, खांबोली, कातरखडक, पिंपोली, आंधाले या गावांसह काही उच्चदाब औद्योगिक अशा सुमारे ६५०० ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत बंद राहील. गुरूवारी, दि. ४ एप्रिलला २२ केव्हीच्या दोन वाहिन्यांचा वीजपुरवठा बंद राहील. त्यामुळे पिरंगुट गाव, पिरंगुट औद्योगिक परिसर, पौड, दारवली, करमोळी, चाले, दखणे, खुळे, साथेसाई, नांदगाव, कोंढावळे, रावडे, शेरे, वेलावडे, जामगाव, दिसली यासह कोळवण खोऱ्यातील सर्व गावे व वाड्यावस्त्यांमधील सुमारे १८ हजार ५०० ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत बंद राहील.

तसेच शुक्रवारी, दि. ५ एप्रिलला महावितरणच्या २२ केव्हीच्या तीन वाहिन्यांचा वीजपुरवठा बंद राहील. त्यामुळे भुगाव, भूकूम, खातपेवाडी, लवळे, चांदे, नांदे या गावांतील सुमारे २७ हजार ५०० ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत बंद राहील. तर शनिवारी, दि. ६ एप्रिलला उरवडे, कासारआंबोली, धोत्रेवाडी, आंबेगाव, मारणेवाडी, कोंढूर, कोंढावळे, आंधगाव, आंबरवेत, आमराळेवाडी, गडगावणे यासह मुठा खोऱ्यातील सर्व गावे व वाड्यावस्त्यांमधील सुमारे ९ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत बंद राहणार आहे.

# हातकणंगलेत तिरंगी लढतीची शक्यता

## लोकसभा निवडणुकीत वंचित आघाडी ठरणार गेमचेंजर?






**लोकसभा निवडणूक २०१९ मधील मताधिक्य...**

| | धैर्यशील माने | राजू शेट्टी |
|---|---|---|
| इचलकरंजी | १,२४,८३७ | ४९९०७ |
| हातकणंगले | १,१८,६८८ | ७३,२२१ |
| शिरोळ | ९२,९२९ | ९९,९७७ |
| शाहुवाडी | ९३,९२१ | ७२,०५१ |
| इस्लामपूर | ७४,७०० | ९३,२५० |
| शिराळा | ७७,४२२ | ९८,६४६ |

**रोहन साजणे**

**राजदंड / हातकणंगले**

हातकणंगले लोकसभा मतदार संघ म्हणजे सतत चर्चेत राहणारा मतदार संघ, या मतदार संघातील मतदार कधी कुणाचा निकाल बदलतील, हे काही सांगता येत नाही. राज्यातील बदललेल्या राजकीय परस्थितीचा परिणामयंदाच्या लोकसभा निवडणुकीत दिसणार आहे. महायुती विरूध्द महाविकास आघाडी अशी जरी लढत होणार असली तरी हातकणंगलेमध्ये स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक व माजी खासदार राजू शेट्टी यांनी 'एक ला चलो'ची भूमिका घेतली आहे. महायुती व महाविकास आघाडीकडून त्यांना सोबत घेण्याचे प्रयत्न ही झाले, मात्र त्यांच्या कडून कसलाच प्रतिसाद मिळत नसल्याने दोन्ही कडूनही प्रयत्न थांबले आहेत.

२०१९ च्या लोकसभा निवडणूकीत विद्यमान खासदार धैर्यशील माने व माजी खासदार राजु शेट्टी यांच्यात काटे की टक्कर लढत झाली. शेवटच्या टप्प्यात जातीय समीकरणांची जुळवाजुळव झाली आणि शेट्टींचा पराभव झाला. ऊस पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मतदार संघात दोन जिल्ह्यातील इचलकरंजी, हातकणंगले, शिरोळ, शाहुवाडी-पन्हाळा, इस्लामपूर-शिराळा या विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो. या पैकी तीन मतदार संघ महाविकास आघाडीकडे, तर तीन मतदार संघ महायुतीकडे आहेत. विद्यमान खासदार धैर्यशील माने यांना उमेदवारी मिळवण्यासाठी यंदा खूप उठाठेव करावी लागली. त्यातच भाजपने या मतदार संघावर हक्क सांगुन खासदार माने यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. मात्र मुख्यमंत्र्यांच्या आशिर्वादाने खासदार माने पुन्हा उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाले. असे असले तरी चक्क भाजप पदाधिकारीच सोशल मीडियावरून त्यांना इशारे देताना दिसत आहेत. त्यामुळे भाजप समर्थक मानेंना साथ देणार का हे पहावं लागणार आहे. तर एकीकडे महाविकास आघाडीची ऑफर नाकारून 'एक ला चलो'च्या भूमिकेवर ठाम राहिलेल्या शेट्टी यांना हि निवडणूक सोपी वाटत असली तरी ते कितपत यशस्वी होतात, हे येणारा काळच ठरवणार आहे.

दुसरीकडे इचलकरंजीतून माजी मंत्री व विद्यमान आमदार प्रकाश आवाडे यांचे चिरंजीव राहुल आवाडे यांनी ही भाजपकडून उमेदवारीसाठी प्रयत्न चालू केले होते, मात्र महायुतीकडून मानेंचे नाव फायनल झाल्याने त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. आपण निवडणूक लढणारच या मतावर राहुल आवाडे ठाम आहेत. त्यांनी महाविकास आघाडीकडून चाचपणी सुरु केली आहे.

महाविकास आघाडीकडून माजी आमदार सुजित मिणचेकर व माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांना तयारीत राहण्याच्या सुचना आहेत. तर २०१९ च्या निवडणूकीत गेम चेंजर ठरलेल्या वंचित बहुजन आघाडीला ही यंदा महत्व आले आहे. वंचित ही एका मात्तब्बार उमेदवाराच्या शोधात आहे. त्यामुळे हातकणंगले लोकसभेची निवडणूक काटे की टक्कर होणार यात शंका नाही.

मराठा समाजाला ओबिसी कोठयातून आरक्षण मिळाले नसल्याने मराठा समाजामध्ये सरकारबद्दल तिव्र नाराजी आहे. त्यामुळे मराठा समाजातूनहि लोकसभेसाठी इच्छुकांच्या हालचाली चालू झाल्या आहेत. मराठा समाजाची उमेद्वारी कोणाच्या पथ्यावर पडणार हेही पहावं लागेल .

या निवडणुकीच्या निमीत्ताने महाविकास आघाडीच्या आमदार जयंत पाटील, आमदार राजू आवळे, आमदार मानसिंग नाईक, माजी आमदार डॉ सुजित मिणचेकर, सत्यजित पाटील सरूडकर, उल्हास पाटील यांची, तर महायुतीकडून आमदार विनय कोरे, आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्यासह जिल्ह्यातील मत्तब्बर नेत्यांची कसोटी लागणार आहे.

### राहुल आवाडेंनी गाठले 'मातोश्री'

**आमदार प्रकाश आवाडे यांनी गत विधानसभा अपक्ष लढवली होती. निवडून आल्यानंतर त्यांनी भाजपाला पाठींबा दिला होता. मात्र अंतर्गत विरोधामुळे आवाडे गटाचा भाजप प्रवेश लांबत गेला. त्यातच राहुल यांच्यासाठी भाजपाकडून मिळालेले आश्वासन पाळले गेले नाही, असा या गटाचा आरोप आहे. निवडणूक लढवण्यावर ठाम राहिलेल्या राहुल आवाडे यांनी आता मातोश्री गाठले असून तेच महाविकास आघडीचे उमेदवार असण्याची शक्यता आहे.**

### वंचित ठरणार 'गेमचेंजर'

**हातकणंगले लोकसभा मतदारसंघात वंचीत कडून माजी जिल्हा परिषद सदस्य डी. सी. पाटील यांच्या नावाची चर्चा आहे. डी. सी. पाटील जिल्हा परिषद अध्यक्ष असताना त्यांनी केलेल्या विकास कामांची चर्चा आजही जिल्ह्याच्या ग्रामीण भागात होत असते. आजही त्यांचा संपर्क आहे. त्यांना वंचितकडून उमेदवारी मिळाल्यास ते 'गेमचेंजर' ठरू शकतात.**

# उन्हाचा पारा चढला; लोणी काळभोर परिसरातील नागरिकांची दमछाक



**राजदंड / लोणी काळभोर**

राज्यात सर्वत्र उन्हाचा पारा एवढा चढला असून रखरखत्या उन्हात बाहेर फिरणे अवघड झाले आहे. कडक उन्हाची झळ अंगाला सोसवत नाही. अशात मंगळवारी (ता. २) पुन्हा एकदा उन्हाचा चटका पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, उरूळी कांचनसह परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे. दिवसभर तीव्र सूर्य किरणांपासून बचाव करताना पूर्व हवेलीतील नागरिकांची दमछाक झाली आहे.

साधारणतः परिसरातील अधिकतम तापमान उन्हाळ्यात ३५ ते ३८ अंश सेल्सिअस असते. मात्र, यंदा या आठवड्यात लोणी काळभोरसह परिसरातील हेच तापमान ३८ अंश सेल्सिअस नोंदले गेले. लोणी काळभोरसह गावोगावी, वाडी - वस्तीवर, शेत शिवारात इतक्या वाढीव तापमानाची सवय नसल्याने लोकांच्या अंगाची लाही – लाही होत आहे. त्यामुळे कामाशिवाय लोक घराबाहेर किंवा कामाच्या ठिकाणांहून सकाळी अकरा ते दुपारी साडेचार दरम्यान बाहेर पडणे टाळतात.

सकाळी अकरा ते दुपारी साडेचार दरम्यान उन्हाचा चटका इतका असतो की, नागरिक घराबाहेर किंवा कामाच्या ठिकाणाहून बाहेर पडायचे टाळत आहेत. पाणी टंचाईच्या झळाही यंदा वाढीव तापमानाने बसू लागल्या आहेत. तसेच भाजीपाला व पिकेही सुकू लागली आहेत. कामानिमित्त बाहेर असलेल्या नागरिकांकडून उपरणे, टोपी, रुमाल आदीच्या माध्यमातून सूर्य किरणांपासून बचाव करीत असल्याचे दिसून येत आहे. उष्ण लाटेच्या पार्श्वभूमीवर येत्या काही दिवसांत पाऱ्यात आणखी वाढ होऊन उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उन्हाच्या तीव्रतेने दुपारी रस्ते ओस पडू लागले असून बाजारपेठेवरही उन्हाचा परिणाम जाणवू लागला आहे.

दरम्यान, तापमानात दररोज हळूहळू वाढ होत असून यामुळे नागरिकांना उन्हाच्या झळा बसताना दिसत आहे. त्यामुळे शरिरात उष्णतेचे प्रमाण वाढत असल्याने अनेक आजारांना निमंत्रण मिळत आहे. वाढत्या उन्हामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे आरोग्याची खबरदारी घेण्याचे गरजेचे असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

उन्हाचा पारा वाढत असल्याने उष्माघात होण्याची दाट शक्यता असते. नागरिकांनी उन्हापासून काळजी घेणे गरजेचे आहे. वाढलेल्या उन्हामुळे गॅस्ट्रोसारखी साथ येण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी शरीरातील पाण्याची पातळी व्यवस्थित राहील, यासाठी लिंबू सरबत, उसाचा रस, फळांचा रस घेणे गरजेचे आहे. उन्हातून आल्यावर लगेच पाणी पिणे टाळावे. शरीरातील पाण्याची पातळी व्यवस्थित राखावी तसेच उन्हापासून शरीराचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

# मराठा समाजातील मुलांना 'एसईबीसी'अंतर्गत दाखले द्यायला सुरूवात



**राजदंड / फलटण**

फलटण तालुक्यातील मराठा समाजातील मुलांना 'एसईबीसी' अंतर्गत दाखले द्यायला सुरूवात केली आहे. जात प्रमाणपत्र आणि 'नॉन क्रिमिलियर' असे दोन्ही दाखले परिशिष्ट 'अ' मधून दिले जातील. येणाऱ्या पोलिस भरती परीक्षेत फलटण तालुक्यातील कोणत्याही मुलाला दाखल्यांबाबत अडचण येणार नाही, याची दक्षता घेतली जाईल, अशी माहिती फलटणचे प्रांताधिकारी सचिन ढोले यांनी दिली.

# 'कॅलेंडर' वाटल्यावरून मारहाण

**राजदंड / अकलूज**

आमच्या भागात कॅलेंडर का वाटता म्हणत दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी मारहाण करत सुमारे १२ हजार रुपयांचे कॅलेंडर पळवून नेले. माळीनगर (ता. माळशिरस) येथे ही घटना घडली. याबाबत अमित संजय भुईटे (रा. वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा) यांनी अकलूज पोलीसांत तक्रार दाखल केली.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनूसार, संजय बाबासाहेब पवार (रा. साखरवाडी, ता. फलटण, जि. सातारा) माळीनगर गावातील जयसिंहनगर परिसरात दि, २८ मार्च २०२४ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास आपल्या जवळील कॅलेंडर वाटत फिरत होते. त्यावेळी विराज निंबाळकर व दादा लवटे दुचाकीवरून (एमएच ४५ एएन ६२५०) आले व तुम्ही कॅलेंडर वाटु नका, म्हणत संजय पवार यांना शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. पवार यांच्याकडील प्रत्येकी ६० रुपये किंमतीची २०० कॅलेंडर (किंमत रुपये १२ हजार) पळवून नेली. यानंतर अमित भुईटे व संजय पवार अकलूज पोलीस ठाण्यात आले. भुईटे यांनी निंबाळकर व लवटे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली.

या घटनेची पोलीस हवालदार संजय शिरतोडे तपास करत आहेत.

# नागझरीत लोकसहभागातून होणार जलसंधारण

## कामास सुरूवात; नागझरी ग्रामविकास संस्थेचा अभिनव उपक्रम

**राजदंड / कोरेगाव**

नागझरी ग्रामविकास संस्था नागझरी या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी म्हणून लोकसहभागातून जलसंधारणच्या कामाचा नागझरी येथे प्रारंभ करण्यात आला. गाव कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात नसून पाण्यापासून वंचित आहे. नागझरी येथील युवकांनी ग्रामविकासाची कामे करण्यासाठी नागझरी ग्रामविकास संस्थेची स्थापना केली. आज हि संस्था वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या




माध्यमातून सामाजिक व ग्रामविकासाचे उपक्रम राबवित आहे. या संस्थेची स्थापना जानेवारी २०२४ रोजी केली असून या संस्थेच्या माध्यमातून दर रविवारी ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत पहाटे संपूर्ण गावातील रस्ते साफसफाई केली जाते. महिला दिनाचे औचित्य साधून नागझरी येथे महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी होम मिनिस्टर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नागझरी येथील कर्तृत्ववान ५ महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी नागझरी येथील शंकरराव भोसले पाटील, शंकर बाजीराव भोसले, रामचंद्र फडतरे, प्रविण भोसले, प्रल्हाद भोसले, शंकर भोसले, आण्णासो भोसले, प्रशांत भोसले, प्रविण भोसले, संस्थेचे अध्यक्ष ज्ञानदेव भोसले, सचिव नामदेव गुरव, मानसिंग भोसले, सचिन भोसले, जगन्नाथ गुरव, चक्रधर मोरे, रामदास भोसले, सुधीर भोसले व ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'चिरीमिरी' घेणारा वाहतूकचा पोलीस कर्मचारी निलंबित

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

दोन दिवसांपूर्वी पुण्यातील एम जी रोड वर एक वाहतूक कर्मचारी लपून ''चिरीमिरी'' घेत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याप्रकरणी कर्तव्यात कसूरी केल्याप्रकरणी वाहतूक विभागाचे कर्मचारी यांचे निलंबन करण्यात आले आहे.

वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त रोहिदास पवार यांनी ही कारवाई केली. विजय मेवालाल कनोजिया असे या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कनोजिया यांची नेमणूक पुण्यातील लष्कर वाहतूक विभागात करण्यात आली होती. कर्तव्यावर असताना त्यांनी एका दुचाकीस्वाराला त्याचा गाडीला फॅन्सी नंबर प्लेट असताना त्यावर कारवाई न करता सोडुन दिले. याबाबत एक व्हिडिओ बनवुन 'मार्च एन्ड एम जी रोड' असे नाव देत तो सोशल मीडियावर व्हायरल केला होता.

याप्रकरणी वरिष्ठ पोलिसांनी चौकशी करत या सगळ्या प्रकरणी कर्तव्यात कसूरी केल्याप्रकरणी आणि पोलिसांची प्रतिमा मलिन केल्यामुळे कनोजिया यांना निलंबित केले आहे.

# 'वायसीएम'मध्ये मेस्कोच्या १७ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती

**राजदंड न्यूज नेटवर्क / पिंपरी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील पदव्युत्तर शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांचे वसतिगृह तसेच अतिदक्षता विभागासाठी (आयसीयू वॉर्ड) महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाचे (मेस्को)१७ सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत.

'वायसीएम' रुग्णालयात अकरा मजली इमारत तयार झाली आहे. इमारतीच्या आठव्या, नवव्या व दहाव्या मजल्यावर पदव्युत्तर शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृह असणार आहे. तसेच रुग्णालयातील आयसीयू वॉर्ड क्रमांक १, २ व ३ येथील रुग्णांच्या नातेवाईकांची गर्दी कमी करण्यासाठी तीन पाळीमध्ये अतिरिक्त सुरक्षारक्षकांची आवश्यकता असल्याचे रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी कळविले आहे. त्यानुसार, सुरक्षा विभागाने मेस्कोचे १७ अतिरिक्त सुरक्षा रक्षकांची आंतररुग्ण विभागात नियुक्ती केली आहे. ही नेमणूक २ वर्षांसाठी आहे.

# विहिरीमध्ये बुडून विवाहितेचा मृत्यू

**राजदंड / सातारा**

देगाव (ता. सातारा) येथील विवाहितेचा गावाजवळ असलेल्या विहिरीमध्ये बुडून मृत्यू झाल्याची नोंद सातारा तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चैताली विश्वास मोरे (वय २७, रा. कारंडवाडी पो. देगाव, ता.जि. सातारा ) या विवाहितेचा विहिरीमध्ये बुडून मृत्यू झाला.

दि. २६ मार्च रोजी ही घटना घडली असून या प्रकरणाची नोंद सातारा तालुका पोलिस ठाण्यात झाली आहे.

या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.


# बाणेर येथील राममंदिराचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर...

## संजय मुरकुटे यांनी केला पूर्ण खर्च

**राजदंड / बाणेर, बालेवाडी**

बाणेर गावातील कै. पै. ज्ञानोबा गेणूजी मुरकुटे किर्तन मंडपाजवळील राम मंदिराचे काम हाती घेण्यात आले होते. मुरकुटे परिवाराकडून या मंदिराचा पूर्ण खर्च करण्यात आला होता. आज ते मंदिर पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

संजय (नाना) मुरकुटे यांच्यातर्फे आणि जयेश मुरकुटे सोशल फाऊंडेशन यांच्या वतीने बाणेर गावातील भव्य राममंदिर बांधकाम करण्यात आले. हा परिवार सतत सामाजिक आणि धार्मिक कामामध्ये पुढे असतो. जयेश सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष जयेश मुरकुटे यांच्यावतीने अनेक धार्मिक कार्य केले जातात. क्रिकेट स्पर्धा, मॅराथॉन, गोरगरिब जनतेच्या अडीअडचणी सोडविणे, इतर सामाजिक कार्यात सहभाग, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण आणि संगोपण, पॅनकार्ड क्लब रोडवरील अपूर्ण रस्त्याबाबत आंदोलन, रोडवरिल खड्डे बुजविण्याकरिता सतत मनपाला धारेवर धरणे, स्मशान भूमीकडील रस्ता खराब झाला असता मनपाला निवेदन देऊन कामे मार्गी लावणे, अशी



अनेक कामे जयेश सोशल फाऊंडेशनतर्फे केली आहेत.

राममंदिराचे पूर्ण काम यांच्याकडून घडते आहे, ही एक उल्लेखनीय बाब आहे. कोणत्याही पक्षाशी त्यांचा संबंध नसतानाही एक सामाजिक दायित्व यांच्या परिवाराकडून घडते आहे. एवढेच नव्हे तर कोविड काळात यांची रुग्णवाहिका सतत गरीब जनतेकरिता हजर होती. आताही गरीब जनतेकरिता रुग्णवाहिका फोन केला की सतत धावते. यांच्या नि:स्वार्थी कार्याबद्दल जनता यांच्या पाठीशी सतत उभी राहते. बाणेर गावात राममंदिराचे काम केल्याबद्दल मुरकुटे परिवाराचे कौतुक होत आहे.



संजय (नाना) मुरकुटे

# सुशोभीकरणासाठी मुख्याधिकारी 'फिल्ड'वर...

## महाबळेश्वरमधील काम उन्हाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना

**राजदंड / महाबळेश्वर**

सुशोभिकरणाच्या नावाखाली महाबळेश्वरच्या बाजारपेठेत संथ गतीने सुरू असलेले विकास काम उन्हाळी हंगामापूर्वी पूर्ण व्हावे, या साठी पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील स्वत: फिल्डवर उतरले आहेत. त्यांनी पालिकेचे आवेक्षक व इतर अधिकारी यांच्याबरोबर बाजारपेठेत सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. उन्हाळा संपण्यापूर्वी काम पूर्ण करण्याच्या सुचना त्यांनी ठेकेदाराला केल्या आहेत.

बाजारपेठ सुशोभिकरणाचा सुंदर आराखडा तयार करण्यात आला होता, परंतु मुठभर लोकांच्या मागणीनुसार पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी या आराखडयात मनमानी बदल केला आणि या आराखडयाची वाट लागली. या बदललेल्या आराखडयानुसार सुशोभिकरणाच्या नावाखाली बाजारपेठेत जे काम सुरू आहे, ते काम म्हणजे बाजारपेठेचे विद्रुपीकरण व बकालीकरण सुरू असल्याचे मत आता व्यक्त केले जात आहे. सुशोभिकरण असो अथवा विद्रुपीकरण, जे काम सुरू आहे ते उन्हाळा हंगामापूर्वी पूर्ण करा, अशी शहरातुन मागणी होऊ लागली आहे. या मागणीची दखल जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली असून या कामावर देखरेख ठेवण्यासाठी सातारा पालिकेचे प्रशासक अभिजित बापट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बापट यांनी केलेल्या सूचनेनुसार पालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील हे देखील ॲक्शन मोडवर आले असून बापट यांनी केलेल्या सुचनांची तंतोतंत अंमलबजावणी व्हावी, या साठी ते स्वत: फिल्डवर उतरले आहेत. त्यांनी बाजारपेठेत फिरून तसर्व कामाची पाहणी केली. हे काम उन्हाळी हंगामापूर्वी पूर्ण करण्याच्या दृष्टिने नियोजन केले आहे. त्या नुसार त्यांनी ठेकेदारास सुचना केल्या आहेत.

### ठेकेदराची कानउघाडणी

**अभिजित बापट यांनी नुकतीच या कामाची माहिती घेतली. कामाबाबत ते कमालीचे नाराज झाले. त्यांनी पालिकेचे ठेकेदार व त्यांचे प्रतिनिधी यांची पालिकेत बैठक घेतली. कामाचे नियोजन नसल्याचे स्पष्ट करून बापट यांनी त्यांची कानउघाडणी केली. सुमारे तीन तास सुरू असलेल्या या बैठकीत बापट यांनी सर्वांची शाळा घेतली. बापट दर शनिवारी महाबळेश्वरला भेट देऊन कामाची पाहणी करणार आहेत. या कामाचा अहवाल ते जिल्हाधिकाऱ्यांना सादर करणार आहेत**

### व्यापारी कामाबाबत साशंक

**रस्त्याच्या गटाराचे काम व त्या अनुषंगाने सुरू असलेले काम आता पूर्णत्वाला आले आहे. रस्त्यावर आता पीसीसीचे सुरु करण्यात येणार असून लवकरच या पीसीसीवर दगडी रस्ता तयार करण्यात येणार आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर बाजारपेठेचा चेहरा बदलला जाणार असल्याचा दावा प्रशासनाच्यावतीने केला जात असला तरी बाजारपेठेतील व्यापारी मात्र या विकास कामाबाबत कमालीचे साशंक आहेत.**



# न्यायालयाच्या आदेशाचा भंग : तिघांवर गुन्हा

**राजदंड / सातारा**

कर्ज रक्कम मुदतीत न भरल्याने न्यायालयाच्या परवानगीने फ्लॅट सीलबंद असताना ते सील तोडून न्यायालयाच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी तिघांवर सातारा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहिती अशी, समरजीतसिंग कुलदीपसिंग फरांगी, लखविंद कुलदीपसिंग फरांगी, कुलदीपसिंग मखखनसिंग फरांगी (तिघे रा. संभाजीनगर, सातारा) यांच्याविरुध्द प्रकाश तानाजी बाबर (रा. शाहूनगर, सातरा) यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. २७ मार्च रोजी घडली आहे.

## स्थित्यंतर

अनेक धर्म-पंथ, जाती-जमाती, भाषा अशा विविधतेने नटलेल्या या देशाला एकसंध ठेवायचे असेल तर एकमेकांबद्दल द्वेषाची भावना निर्माण होता कामा नये. या मूलतत्त्वावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना उभी केली; त्याच राज्यघटनेची मोडतोड जर कोणीकरीतअसेलतरत्याला कडाडून विरोध केला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वारसदाराकडून जनतेच्या अधिक अपेक्षा होत्या, त्यांनी अपेक्षाभंग केला आहे. अजूनही वेळ गेलेली नाही, पण लक्षात कोण घेतो. रिपब्लिकन नेत्यांची मानसिकता अजब आहे. एक तर त्यांना नवीन नेतृत्व घडवायचे नसते. कार्यकर्त्याला मोठे होऊ द्यायचे नसते. मत विभाजन करून दुसऱ्या तिसऱ्या पक्षालाच ताकद द्यायची आणि त्या बदल्यात काय मिळवायचे हे त्यांनाच ठाऊक. गेल्या पाच वर्षांपूर्वीच्या लोकसभा निवडणुका आंबेडकर यांनी वंचित बहन विकास आघाडीच्या नावाखाली एकत्र वंचित बहुजन सत्तेपासून वंचितच ! लढवल्या. त्या निवडणुकीत ' वंचित- एमआयएम' आघाडीचे इम्तियाज जलील हे छत्रपती संभाजीनगरमधून खासदार झाले.

'वंचित'ला राज्यात ७.६२ टक्के मते मिळाली. १९९१ नंतर स्वतः आंबेडकर यांना संसदेत जाता आलेले नाही. त्यांच्या ताब्यात एकमेव अकोला जिल्हा परिषद आहे. गेल्यावेळी किती जागा मिळाल्या, यापेक्षा त्यांच्यामुळे काँग्रेस आघाडीचा किमान सात-आठ जागांवर पराभव झाला. त्यामुळे 'वंचित' चे उपद्रवमूल्य लक्षात आले. विधानसभेच्या निवडणुकीत दोन्ही काँग्रेसने 'वंचित' बरोबर आघाडी करण्याचा प्रयत्न केला; परंतु सातत्याने ताणून धरण्याच्या त्यांच्या वृत्तीने महाआघाडीशी त्यांचे जमले नाही. अर्थात आंबेडकर यांची खेळी जिंकण्यासाठी नसते, तर कुणाच्या तरी फायद्यासाठी असते, हे आता जनतेच्याही लक्षात आले आहे. त्यामुळे गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत 'वंचित'ला लोकसभेइतकीही मते मिळू शकली नाहीत. यावेळी 'एमआयएम' त्यांच्यापासून दूर गेली. आता पुन्हा एमआयएम ने दोस्तीचा हात पुढे केला असला, तरी तो 'वंचित' स्वीकारते का, हा खरा प्रश्न आहे. आंबेडकर यांचा दोन ध्रुवांना जवळ आणण्याचा प्रयत्न असतो; परंतु तो तितकासा यशस्वी होत नाही. त्याचे कारण त्यांचे धरसोडीचे राजकारण हे आहे. आता आंबेडकर यांनी जरांगे पाटील आणि ओबीसींना एकत्र आणण्याचा असाच प्रयत्न केला. जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी केलेले आंदोलन आणि त्यांचा ओबीसीतूनच आरक्षणाचा हट्ट पाहता ओबीसी संघटना आरक्षणाचाहट्टपाहता आणि जरांगे एकत्र येणे अशक्यप्रायच होते. महाविकास आघाडी सोबत आपण जाण्यास इच्छुक आहोत तसेच भारतीय जनता पक्षासारख्या शक्तींचा पराभव करणे हे आपले उद्दिष्ट आहे, असे सातत्याने म्हणत असतात.

# वंचित बहुजन सत्तेपासून वंचितच!

राज्यातील वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांचे राजकारण 'बोले तैसा न चाले..', या प्रकारात मोडणारे असल्याचे दिसते. भारतीय जनता पक्षाच्या धोरणावर टीका करायची, संविधान वाचवण्यासाठी एकत्र लढण्याची भाषा करायची आणि थातूरमातूर कारणे देत स्वबळावर निवडणूक लढवायची, या त्यांच्या धोरणाचा फायदा वंचित आघाडीला झाला असता, तर भाग वेगळा; परंतु ज्या उजव्यांवर टीका करायची, त्यांच्याच सोयीचे राजकारण करायचे, हे आता लपून राहिलेले नाही.





मात्र, आता जागा वाटपाची बोलणी फिसकटल्याने त्यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. आंबेडकर यांच्यावर भाजपची बी टीम अशी टीका केली जाते. त्यावर ते संताप व्यक्त करतात; परंतु त्यांचे वागणे मात्र भाजपच्या फायद्याचे असते. आंबेडकर हे अतिलोकशाहीवादी असल्यासारखे वागतात. अगोदर काँग्रेसपेक्षा आमची ताकद जास्त आहे, असे सांगायचे. नंतर २४ जागांची मागणी करायची. त्यानंतर महाविकास आघाडीत प्रत्येक पक्षाला १२ जागा देण्याचा प्रस्ताव सादर करायचा, आघाडीत समाविष्ट होण्याअगोदर तिच्यावर अटी लादायच्या आणि तडजोड स्वीकारण्यास तयार नसायचे. अशा धरसोडपणामुळे महाविकास आघाडी ही वंचित पासून जरा सावधच होती. सर्व बैठकांनात्यांना बोलावले जात नव्हते. त्यावरही त्यांनी खळखळ केली. आता त्यांची संभावना पुन्हा भाजपचीबीटीम म्हणून व्हायलालागली आहे. भुतकाळात त्यांनी स्वतंत्र लढण्याची भूमिका घेतल्यामुळे धर्मनिरपेक्ष मते विभागली गेली आणि कळत नकळत त्याचा भाजपला फायदा झाला आहे. त्यामुळे उजव्या विचारसरणीच्या विरोधात प्रबळ आघाडी तयार करण्याची प्रक्रिया कमकुवत बनली आहे. वंचित बहुजन आघाडी खरंच महाविकास आघाडीमध्ये सहभागी होण्याबाबत गंभीर आहे का, यावरही शंका उपस्थित होत आहे. वंचित बहुजन आघाडीद्वारे सामाजिक न्यायाच्या राजकारणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. तसेच भाजपचा पराभव करण्यासाठी पीडित गटाने एकत्र येण्याचे आव्हानही त्यांच्यामार्फत करण्यात येते; परंतु यांची कठोर राजकीय भूमिका पाहता, केवळ निवडणुकांमध्ये लाभ मिळवण्याचा विचार त्यामागे असल्याची शंका आल्याशिवायही राहत नाही. यापूर्वी त्यांनी महाविकास आघाडीबरोबर न जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यावरून हिंदुत्वाच्या विचारसरणीच्या पक्षांचे उच्चाटन करण्याला प्राधान्य देण्याऐवजी त्याची कृती त्यांना बळ देणारी ठरते. वंचित बहुजन आघाडीने गेल्या दोन निवडणुकांमध्ये स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतल्याने महाराष्ट्रात भाजपला थेटपणे फायदा झाला असून विरोधकांना त्याचा फटका बसला आहे.

स्वबळावर लोकसभा निवडणुकीत विजय मिळवण्याची त्यांची क्षमता अगदी मर्यादित किंवा मोजक्या मतदारसंघामध्ये दिसते. वंचित बहुजन आघाडीला एकही जागा जिंकता आली नसली तरी त्यांना उल्लेखनीय मते मिळाली. त्यावरून दलित आणि बहुजन मतदारांवरील त्यांचा प्रभाव दिसून येतो; पण निवडणुकीच्या राजकारणात हीच त्यांची मर्यादाही आहे. वंचित बहुजन आघाडीला इतर सामाजिक समुदायांना एकत्र आणण्यात यश मिळाले नाही. गेल्या काही भाषणांमधून 'वंचित'ने सातत्याने उजव्या विचारसरणीच्या विरोधात लढण्याची भूमिका मांडली आहे त्यामुळे त्यांना अधिक मोठ्या गटापर्यंत पोहोचण्यात यश मिळाले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पीडित सामाजिक समूह यांचा पक्ष म्हणून त्यांनी ओळखही मिळवली आहे; पण अशाप्रकारच्या चौकटीत राहून राजकारणात प्रभावी राजकीय शक्ती म्हणून ओळख निर्माण करण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे प्रमुख राजकीय समुदायांच्या ओबीसी, मुस्लीम किंवा मराठा यांच्या पाठिंब्याशिवाय दलित आणि निम्न वर्गातील ओबीसी यांच्यातील 'सोशल इंजिनीअरिंगचा प्रयत्न यशस्वी होणे कठीण आहे.

राही भिडे
९८६७५२१०४९

# मुख्याध्यापक संघाची निवडणूक बिनविरोध

## अध्यक्षपदी राहुल पवार तर सचिव आर.वाय.पाटील





**शिरोली :** कोल्हापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची निवडणूक बिनविरोध झाली. संघाचे अध्यक्षपदी पन्हाळा तालुक्यातील पडळ हायस्कूल पडळचे मुख्याध्यापक राहुल पवार यांची तर सचिवपदी आदर्श प्रशाला कोल्हापूरचे मुख्याध्यापक आर.वाय.पाटील, यांची निवड झाली .

आमदार सतेज पाटील यांनी दोन्ही गटाना ठरवून दिलेल्या फॉर्म्युल्यानुसार ही निवडणूक बिनविरोध झाली.

शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनीही संघाची निवडणूक बिनविरोध व्हावी ही भूमिका कायम ठेवली होती.

दादा लाड यांच्या गटास अध्यक्ष, सचिव व खजानिस ही तीन पदे व नऊ संचालक अशा १२जागा तर बाबा पाटील गटाला दोन उपाध्यक्ष व सहसचिव ही तीन पदे व आठ संचालक अशा ११जागा देऊन तोडगा काढला होता. त्यानुसार दोन्ही गटांनी आपले उमेदवार निश्चित करून जाहीर केले व इतरांना अर्ज माघार घेण्यास आवाहन केले. त्यानुसार उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतले.अध्यक्ष व सचिव ही मुख्याध्यापक संघातील दोन महत्त्वाची पदे आपल्या गटाकडे मिळवण्यात दादा लाड यशस्वी झाले.

निवडणूक अधिकारी म्हणून सत्यनारायण शेणॉय, सहाय्यक म्हणून समीर कळके, तानाजी पाटील, संजय पाटील यांनी काम पाहिले.

आमदार सतेज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांनी दिलेल्या फॉर्मुल्यानुसार निवडणूक बिनविरोध झाली.डी. बी.पाटील सरांच्या विचारानुसार मुख्याध्यापक संघाला पुनर्वैभव मिळवून देऊ.शैक्षणिक प्रश्नासाठीही मुख्याध्यापक संघ कार्यरत राहील.

दादा लाड व बाबा पाटील गटनेते बिनविरोध झालेले संचालक मंडळ असे अध्यक्ष राहुल दत्ताजीराव पवार (पडळ हायस्कूल पडळ) उपाध्यक्ष मिलिंद भीमराव पांगिरेकर (गारगोटी हायस्कूल) रवींद्र यशवंत मोरे (चेनिशेट्टी हायस्कूल निगवे ) सचिव आर.वाय.पाटील (आदर्श प्रशाला कोल्हापूर) सहसचिव श्रीकांत हरी पाटील (ज्ञानराज विद्यालय सावर्डे तर्फ असंडोली) खजानीस सागर कुमार चुडाप्पा( खोतवाडी हायस्कूल) संचालक गणपती शंकर पाटील (इंदिरा गांधी हायस्कूल सरूड) जयसिंग ज्ञानदेव पाटील (भैरवनाथ हायस्कूल बड्याचीवाडी) रामचंद्र कृष्णा शिंदे (रामलिंग हायस्कूल नूल) संजय शिरपती देवेकर (दाभिल हायस्कूल) सुनील महादेव पाटील (हलकर्णी हायस्कूल )पांडुरंग बयाजी भारमल (इंग्लिश स्कूल म्हाकवे) निशिकांत जयसिंगराव चव्हाण (कुमार भवन पुष्पनगर) आनंद दगडू वारंग (निनाई विद्यालय कंरूगळे) माजिद अब्दुल राशीद पटेल( उर्दू हायस्कूल आलास )हेमंत भुपाल धनवडे (पंचशील हायस्कूल शहापूर) एस. के .पाटील (वारके माध्यमिक विद्यालय तुरंबे) युवराज आनंदराव पाटील (माध्यमिक विद्यालय शेळोशी) बसवराज चन्नय्या वस्त्रद( दादासाहेब मगदूम हायस्कूल कोल्हापूर ) महादेव गुंडा पाटील (भैरवनाथ हायस्कूल वरणगे) दामोदर शामराव येरुडकर (माध्यमिक विद्यालय फेजिवडे )मनीषा गुरुप्रसाद यादव (माध्यमिक विद्यालय पेठवडगाव ) हर्षदा हेमंत गोसावी (गर्ल्स हायस्कूल कोल्हापूर) आदींचा समावेश आहे.

# सण, उत्सवांमुळे अवैध शस्त्रसाठा शोध मोहीम

**नाशिक :** लोकसभा निवडणूक, सण, उत्सव यांच्या पार्श्वभूमीवर शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस आयुक्तालय परिमंडळ दोनच्या वतीने कार्यक्षेत्रात अवैध शस्त्रसाठा शोध विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या महिन्यातील गुढीपाडवा, रमजान ईद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रामनवमी हे मोठे सण, उत्सव शांततेत तसेच उत्साहात पार पडावेत, यासाठी शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी सूचना दिल्या आहेत.

नंदुरबारमध्ये आदिवासींना आपलेसे करण्यासाठी काँग्रेसची खेळी, राहुल गांधी यांच्या यात्रेचे 'आदिवासी न्याय यात्रा' नामकरण

या अनुषंगाने परिमंडळ दोनच्या वतीने पोलीस उपआयुक्त मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सातपूर, अंबड, एमआयडीसी चौक, इंदिरा नगर, उपनगर, नाशिकरोड आणि देवळाली कॅम्प पोलीस ठाणे हद्दीत अवैध शस्त्रसाठा शोध मोहीम एक ते ३० एप्रिल या कालावधीत राबवण्यात येत आहे. यामध्ये १० वर्षातील भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हे दाखल असलेल्या संशयितांच्या घराच्या झडत्या घेत चौकशी करण्यात येत असून अवैध शस्त्रसाठ्यांचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना सूचना करण्यात आल्या आहेत. नाशिककरांनी सतर्क राहून कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर शस्त्र निदर्शनास आल्यास किंवा काही माहिती मिळाल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन उपआयुक्त राऊत यांनी केले आहे.

# सोलापूरचे तापमान पोहोचले ४२ अंश सेल्सिअसवर



**सोलापूर:** मार्चच्या शेवटच्या टप्प्यापासूनसोलापूरच्य ातापमानातवाढ होत असतानाच एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात सोलापूरचेतापमान४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. यंदाच्या हंगामातील सर्वोच्च तापमानाची नोंद मंगळवारी झाली.- ऊतएठढखडएचएछढदरम्यान, सोलापुरात उकाडा कायम असून, सोमवारच्या तुलनेत मंगळवारी कमाल तापमानात काहीशी वाढ झाली. मागील काही दिवसांपासून सोलापूर शहरातील तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. पंधरा दिवसापासून उन्हाचे चटके जरा जास्तच बसू लागले आहेत. मंगळवारी तापमानाचा पारा ४२ अंशावर पोहोचला असून किमान तापमान २८.६ एवढे नोंदविले गेले आहे. एप्रिल महिन्यात तापमानात आणखी वाढ होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

दरम्यान, मार्च महिन्यात ३७ अंशावर पोहोचले तापमान एप्रिल महिन्याच्या सुरूवातीपासून सोलापूरचे तापमान ४० अंशापर्यंत पोहोचले होते. मात्र वाढत्या उन्हामुळे उकाडा वाढल्याने सोलापूरकर चांगलेच तापले आहे. या महिन्यात सोलापूरचे तापमान ४२ अंशावर पोहोचले असून एप्रिल महिन्यात ४५ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान वाढणार असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे.

# चेंबरमध्ये प्रशासकाची राजवट संपली; आता व्यापाऱ्यांचे राज्य




**नागपूर :** विदर्भातील व्यापाऱ्यांची सर्वात मोठी संघटना नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सवर असलेली प्रशासकाची नियुक्ती अवैध ठरवत व्यापाऱ्यांची कार्यकारिणी पूर्ववत राहणार असल्याचा निर्णय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठाने सदस्य (तांत्रिक) प्रभात कुमार आणि सदस्य (न्यायिक) व्ही.जी. बिष्ट यांनी मंगळवारी दिला.- ऊतएठढखडएचएछढयाआधी चेंबरच्या कार्यकारिणीवर आर्थिक अनियमिततेचा ठपका ठेवत राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या सदस्यांनी कंपनी कायद्यांतर्गत नागपूर विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सची कार्यकारिणी बरखास्त करीत ३१ जानेवारी २०२३ रोजी नवी दिल्ली येथील यू.एन. नाहटा यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती.न्यायाधिकरणाच्या निर्णयाने चेंबरच्या आधीच्या कार्यकारिणीला पूर्ण अधिकार बहाल झाले आहेत. त्यामुळे चेंबरचे अध्यक्ष अश्विन मेहाडिया आणि अन्य पदाधिकारी बुधवारी चेंबरचा कार्यभार स्वीकारणार आहेत. अश्विन मेहाडिया म्हणाले, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या सदस्यांच्या निर्णयाने व्यापाऱ्यांचा आणि सत्याचा विजय झाला आहे. व्यापाऱ्यांची खरी बाजू पुढे आली आहे. बुधवारी कार्यभार स्वीकारणार असून व्यापाऱ्यांच्या हितासाठी कार्यरत राहू असं त्यांनी सांगितले.

# डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजभूषण समाजकार्य युवा प्रेरणा पुरस्काराचे वितरण

**शिरोळ :** या सृष्टीत पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे एकीकडे भीषण पाणीटंचाई तर दुसरीकडे आती पाण्यामुळे नापीक होणारी जमीन यामुळे सपूर्ण जगात पाण्यामुळे आराजगता माजून तिसरे महायुद्ध होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे वेळीच सावध होऊन पाणी वापराचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे असे विचार जलतज्ञ डॉ राजेंद्रसिंह राणा यांनी व्यक्त केले

येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक संचालक माजी आमदार कै आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांच्या नवव्या पुण्यतिथी निमित्त कारखान्याच्या कार्यस्थळावरील कै दत्ताजीराव कदम कामगार कल्याण मंडळाच्या प्रागणात डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील सोशल फौंडेशनच्यावतीने देण्यात येणारा स्व डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजभूषण समाजकार्य युवा प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता .ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते डॉ राणा यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले त्याप्रसंगी जलतज्ञ राणा हे बोलत होते .



राणा बोलताना म्हणाले की गेली ५० वर्ष मी सामाजिक कार्यात सक्रिय आहे यातील ४२ वर्षे केवळ पाण्याविषयी काम करत असताना अनेक अनुभव मिळाले ज्या ठिकाणी पाणी आहे त्या ठिकाणी अतिलालसा झाली त्यामुळे तेथील जमिनी क्षारपड झाल्या तर ज्या ठिकाणी पाण्याच्या एकएक थेंबाकरिता नागरिकांना दिवसभर भटकंती करावी लागते अशी भयाणावह परिस्थिती पाण्यामुळे झालेली आहे यामुळे पाणी या विषयावरच जगातील ६४ देशातील जनता त्या देशाचे सत्ताकारण ठरवणार असल्याचे चित्र सध्या दिसत आहे तर पाण्यामुळे जगातील बारा देशात सध्या युद्ध सुरू झाले आहे महाराष्ट्र राज्यात पाण्याची कमतरता नाही तर राजस्थानात पाणी मिळणे मुश्किल झाले आहे यावेळी पाणी मिळावे यासाठी चंबळ खोऱ्यातील ३ हजार गुंडांनी हातातील बंदुका सोडून पाणी मिळवण्यासाठी काम केले याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे जगात शांतता सुखसमृद्धी नांदण्यासाठी भविष्यात राज्यकर्त्यांनी पाण्याचे योग्य आणि काटकरपणे नियोजन करणे आवश्यक आहे सन २०१० साली माझ्या हस्ते सा रे पाटील यांना जयसिंगपूरभूषण पुरस्कार देण्यात आला होता आज मला त्यांच्या नावाने समाजभूषण पुरस्कार मिळतो हे माझे भाग्य असून हा पुरस्कार माझ्या पुढील कार्यास प्रेरणादायी ठरेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

डॉ आप्पासाहेब उर्फ सारे पाटील समाजभूषण पुरस्कार जलतज्ञ डॉ राजेन्द्रसिंह राणा यांना एक लाख रुपये रोख रक्कम सन्मानपत्र मानचिन्हे ,डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजकार्य पुरस्कार ग्रामविकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारे भास्करराव पेरे पाटील यांना ५० हजार रुपये रोख रक्कम सन्मानपत्र व मानचिन्हे, तसेच डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील युवा प्रेरणा पुरस्कार महिला कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी किताब पटकावणारी अमृता पुजारी हिला २५ हजार रुपये रक्कम सन्मानपत्र व मानचिन्हे ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते देण्यात आले .

याप्रसंगी बोलताना समाजकार्य पुरस्कार प्राप्त पटोदाचे सरपंच भास्करराव पेरे पाटील म्हणाले,

विकास म्हणजे मानवाने मानवासाठी काय केले तो विकास होय. हे ब्रीदवाक्य डोळ्यासमोर ठेवून गेली २५ वर्षे ,ग्राम विकास कसा करावा याबाबत पाटोदा येथे ग्रामविकासाचे काम सुरू आहे. प्रसंगी साम दाम दंड भेद या नीतीचा वापर करून, ग्रामस्थांना शिस्त लावली. गावातील सर्व नागरिकांना केवळ पाच हजार रुपयांच्या मोबदल्यात ,अनेक सुविधा देऊन सुद्धा आमची ग्रामपंचायत वर्षाला आठ लाख रुपये नफ्यात राहते. गावागावात नागरिकांनी फळाची झाडे लावावीत स्वच्छ पाणी द्यावे गावात स्वच्छता ठेवावी विद्यार्थ्यांना सुसंस्कारित शिक्षण मिळावे घरचा आहार मिळावा वृद्ध नागरिकांचे संगोपन करावे असे आवाहन पेरे पाटील यांनी केले. गेली २५ वर्षे केलेल्या कामाची पोचपावती डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजकार्य पुरस्काराच्यारूपाने मिळाला त्याचा आनंदही होतो पण काम करण्याची जबाबदारीही वाढते असे ते म्हणाले. महिला महाराष्ट्र केसरी पै अमृता पुजारी म्हणाली की डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील युवा प्रेरणा पुरस्कारामुळे मला पुढील खेळासाठी बळ मिळाले असून ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून शिरोळ चा नावलौकिक करण्यासाठी प्रयत्न करू असे तिने आश्वासन दिले

या समारंभाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे म्हणाले की शिरोळ तालुका सुखी व समृद्ध बनला पाहिजे अशीच भूमिका सा रे पाटील यांची होती त्यांच्या विचारांचे अनुयायी बनण्याची आज गरज आणि तशी ताकद आपण मिळवली पाहिजे शिरोळ तालुकाच नव्हे तर महाराष्ट्रामधील माणसांनी करायला पाहिजे आहे .त्यांच्या नावाने दिलेले पुरस्कार सर्वश्रेष्ठ पुरस्कार आहे . इतिहास विसरतात त्यांना वर्तमान घडवता येत नाही .त्यांच्या डोळ्यात स्वप्न पेरणारा सा रे पाटील यांच्यासारखा महापुरुष होऊन गेला आहे हे तुम्ही आम्ही विसरता कामा नये.

दत्त कारखान्याचे चेअरमन सहकारमहर्षी गणपतराव पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून स्वर्गीय डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील यांच्या विचाराचा वारसा चालवत असताना श्री दत्त उद्योग समूहाच्या प्रगती बरोबरच कर्मचारी सभासद यांचे हित साधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे सांगून सा रे पाटील यांची स्मृती चिरंतर ठेवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष विनोद शिरसाठ त्यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. तसेच आपल्या प्रस्ताविकांमध्ये देशातील विविध मान्यवर व्यक्तींना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन स्वर्गीय डॉ आप्पासाहेब उर्फ सा रे पाटील समाजभूषण समाजकार्य युवा प्रेरणा पुरस्कार दिल्याचे सांगितले .

पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी पुरस्कार निवड समितीचे सदस्य अण्णासाहेब पाटील ,(मामा ), अनिल उर्फ सावकर मादनाईक, पृथ्वीराजसिंह यादव ,डॉ अशोकराव माने, माजी आमदार उल्हास पाटील , डॉ सुजित मिणचेकर अनंत धनवडे , सौ मिनाज जमादार , चंद्रकांत जाधव - घुणकीकर ,श्री धारिया , किसन कुऱ्हाडे , कलाप्पाण्णा मग्याणवार ' वैभव उगळे , , डी आर पाटील , रणजीत पाटील , रुस्तूम मुजावर , महेंद्र बागे , डॉ . शिरीष चव्हाण , मुसा डांगे , दिलीप पाटील - कोथळीकर , बाळासाहेब कोळी .कारखान्याचे कार्यकारी संचालक एम व्ही पाटील, शेखर पाटील, दरगु गावडे, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अरुणकुमार देसाई, संचालक अनिलराव यादव, विनया घोरपडे, ,माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील , उद्योगपती मयूरभाई , माजी सरपंच गजानन संकपाळ, डॉ अरविंद माने, शिवाजीराव माने देशमुख, गोरखनाथ माने, धनाजी पाटील नरदेकर, पंडित काळे, बापूसाहेब गंगधर, बाळासाहेब कोळी मुसा डागे, दामोदर सुतार, यांच्यासह कारखान्याचे सर्व संचालक सभासद विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# खलीलने रचिला पाया, मुकेशने चढविला कळस, दिल्लीचा चेन्नईवर २० धावांनी विजय

दिल्ली कॅपिटल्स संघाने बलाढ्य चेन्नई सुपर किंग्सला नमवत आयपीएल २०२४ मधील पहिला विजय नोंदवला. चेन्नईचा दिल्ली संघाने २० धावांनी पराभव केला आणि आपले खाते उघडले आहे. सामना दिल्लीने जिंकला असला तरी चर्चा रंगली ती ४२व्या वर्षी १६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ३७ धावांची खेळी करणाऱ्या महेंद्रसिंग धोनीची. 'माही मार रहा है' या उक्तीचा प्रत्यय घडवत धोनीने षटकार, चौकार लगावणं विसरलो नसल्याचं दाखवून दिलं. पण चेन्नईला धोनीची ही खेळी विजय मिळवून देऊ शकली नाही.

दिल्लीने दिलेल्या १९२ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ १७१ धावाच करूच शकला. खलील अहमद आणि मुकेश कुमारच्या शानदार गोलंदाजीने चेन्नईच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. चेन्नईला १२ चेंडूत ४६ धावांची गरज असताना धोनी आणि जडेजा मैदानात होते. पण मुकेश कुमारने शानदार गोलंदाजी करत एकही बाऊंड्री दिली नाही. गुरू शिष्याच्या या सामन्यात शिष्य ऋषभ पंतने बाजी मारली.

दिल्ली संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ५ गडी गमावून १९१ धावा केल्या. डेव्हिड वॉर्नर (५२) आणि ऋषभ पंत (५१) यांनी अर्धशतके झळकावली. प्रत्युत्तरात चेन्नई सुपर किंग्जला निर्धारित षटकांत ६ गडी गमावून केवळ १७१ धावा करता आल्या. महेंद्रसिंग धोनीने आपली तडाखेबंद खेळी केली. माहीने १६ चेंडूत ३ षटकार आणि ४ चौकारांसहह ३७ धावा करत ते नाबाद राहिले.

१९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्जची सुरुवात खराब झाली. कर्णधार ऋतुराज गायकवाडने पहिल्याच षटकात आपली विकेट गमावली. त्याने २ चेंडूंचा सामना करत १ धाव काढली. खलील अहमदच्या चेंडूवर ऋषभ पंतने ऋतुराजला यष्टीमागे झेलबाद केले. चेन्नईला ७ धावांवर दुसरा धक्का बसला. रचिन रवींद्रची शिकार करून खलील अहमदने सीएसकेला बॅकफूटवर ढकलले. रचिनने १२ चेंडूंचा सामना करत २ धावा केल्या.

दोन मोठ्या विकेट्सनंतर रहाणे आणि मिचेलने संघाचा डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ६८ धावा केल्या. अक्षर पटेलने ही भागीदारी तोडली. धोकादायक ठरत असलेल्या मिचेलला त्याने झेलबाद केले. मिचेलने २६ चेंडूत १ चौकार आणि २ षटकारांसाठी ३४ धावांची खेळी खेळली. अजिंक्य रहाणे आणि शिवम दुबे यांच्यात चौथ्या विकेटसाठी २७ धावांची भागीदारी झाली. मुकेश कुमारने १४व्या षटकात रहाणेला झेलबाद केले.राहाणेने ३० चेंडूत ५ चौकार आणि २ षटकारांच्या आधारे ४५ धावा केल्या.

रहाणे बाद होताट फलंदाजीसाठी आलेला समीर रिझवी गोल्डन डकचा बळी ठरला. मुकेश कुमारने त्याला बाद करत एकाच षटकात २ विकेट्स मिळवल्या. १७व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर शिवम दुबे झेलबाद झाला. त्याने १७ चेंडूत १८ धावा केल्या. यानंतर महेंद्रसिंग धोनी फलंदाजीसाठी मैदानात आला. धोनीने तुफानी खेळी खेळली, पण तो आपल्या संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. धोनी १६ चेंडूत ३७ धावा करत नाबाद राहिला. यादरम्यान त्याने ४ चौकार आणि ३ षटकार मारले. रवींद्र जडेजाने १७ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या. दिल्लीकडून मुकेश कुमारने ३, खलील अहमदने २ आणि अक्षर पटेलने १ विकेट मिळवली.

तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सने ५ विकेट गमावून १९१ धावा केल्या. डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक ५२ धावांची खेळी खेळली. त्याच्याशिवाय कर्णधार ऋषभ पंतने ३२ चेंडूत ५१ धावा केल्या. पृथ्वी शॉचे अर्धशतक हुकले असले तरी त्याने २७ चेंडूत ४५ धावांची शानदार खेळी खेळली. मिचेल मार्शने १२ चेंडूत १८ धावा केल्या. चेन्नईसाठी मथिशा पाथिरानाने ३ विकेट मिळवले आणि एक शानदार झेल टिपला. त्यांच्याशिवाय रवींद्र जडेजा आणि मुस्तफिजुर रहमानने प्रत्येकी १ विकेट मिळवली.

# दिल्लीने चेन्नईला हरवले, पण ऋषभ पंतला बसला मोठा धक्का!

ऋषभ पंतच्या नेतृत्वातील दिल्ली कॅपिटल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा पराभव केला. रविवारी विशाखापटनम येथील डॉ. वाय. एस. राजशेखर रेड्डी एसीए-वीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दिल्लीने चेन्नईचा २० धावांनी पराभव केला. या सामन्यात ऋषभ पंत यानं शानदार अर्धशतक ठोकलं. त्याशिवाय चपळ नेतृत्व करत त्यानं दिल्लीला विजय मिळवून दिला. पण विजयानंतरही ऋषभ पंत याला मोठा झटका (िंप्रंप् इरहू इग्हा) बसला आहे. चेन्नईविरोधात स्लो ओव्हर रेटमुळे ऋषभ पंत याला आर्थिक दंड बसला आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये असा दंड बसणारा पंत दुसरा कर्णधार आहे. याआधी गुजरातचा कर्णधार शुभमन गिल यालाही आर्थिक दंडाचा फटका बसला आहे.



चेन्नईविरोधात स्लो ओव्हर रेटमुळे दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंत याला आर्थिक दंड करण्यात आला आहे. रविवारी विशाखापटनम येथे झालेल्या सामन्यात चेन्नईविरोधात ठरलेल्या वेळामध्ये षटकं न संपवल्यामुळे पंतनं आयपीएलच्या आचारसंहितेचं उल्लंघन केल्याचं समोर आले. त्यामुळे ऋषभ पंत याला १२ लाख रुपयांचा दंड केला. यंदाच्या आयपीएलमध्ये स्लो ओव्हर रेटमुळे आर्थिक दंड बसल्याचा पंत पहिला कर्णधार नाही. याआधी गुरजरातचा कर्णधार शुभमन गिल यालाही १२ लाख रुपयांचा दंड बसला होता. २६ मार्च रोजी चेन्नईविरोधात एम चिदंबरम स्टेडियम झालेल्या सामन्यात शुभमन गिल याला स्लो ओव्हर रेटमुळे १२ लाखांचा दंड ठोठावला होता.

**ऋषभ पंतची शानदार खेळी, धोनीची फटकेबाजी -**

ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. दिल्लीने निर्धारित २० षटकांमध्ये पाच विकेटच्या मोबदल्यात १९१ धावांपर्यंत मजल मारली. दिल्लीसाठी डेविड वॉर्नर आणि ऋषभ पंत यांनी वादळी अर्धशतकं ठोकली. डेविड वॉर्नरने ५२ धावांची खेळी केली. तर ऋषभ पंत यानं ३२ चेंडूमध्ये १६० च्या स्ट्राईक रेटने ५१ धावांची खेळी केली. या खेळीमध्ये पंतने चार चौकार आणि तीन षटकार ठोकले. पंत जुन्या फॉर्मात परतल्याचं दिसले.

दिल्लीने दिलेल्या १९२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईची सुरुवात खराब झाली. ऋतुराज आणि रचिन रवींद्र झटपट माघारी परतले. त्यानंतर अजिंक्य रहाणे यानं डाव सावरला. पण पुन्हा एकदा चेन्नईची फलंदाजी ढेपाळली. अखेरीस माजी कर्णधार एमएस धोनी यानं वादळी फटकेबाजी केली. धोनीने आठव्या क्रमांकावर फलंदाजी करत १६ चेंडूमध्ये नाबाद ३७ धावांची खेळी केली. यामध्ये तीन षटकार आणि चार चौकारांचा समावेश आहे. धोनीच्या फलंदाजीनं चाहत्यांना प्रभावित केले.

## आपलं मनोरंजन

# 'द ग्रेट इंडियन कपिल शो'मध्ये रणबीर कपूरने केला खुलासा ; या कारणामुळे वडील ऋषी कपूरने फटकारले!

कपिल शर्माचा मद ग्रेट इंडियन कपिल शोफ सुरू झाला आहे. हा ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर स्ट्रीम झाला आहे. या शोच्या पहिल्या एपिसोडमध्ये रणबीर कपूर त्याची आई नीतू कपूर आणि बहिण रिद्धिमा कपूर साहनी यांनी हजेरी लावली होती. कपिलच्या शोमध्ये यावेळी नीतू कपूर, रणबीर कपूर आणि रिद्धिमा कपूर साहनी यांनी मिळून अनेक गुपिते एकमेकांसमोर उघड केली. या तिघांनी मिळून कपिलच्या शोमध्ये खूप धमाल केली. या शोचा पहिला एपिसोड शनिवारी ३० मार्च रोजी प्रदर्शित झाला. हा पहिलाच एपिसोड खूप धमाकेदार होता.



रणबीरला ऋषी कपूरने फटकारले : शो दरम्यान कपिल शर्माने नीतू कपूरला विचारले की, तुमच्या कोणत्या सवयी दोन्ही मुलांना आहेत. यावर नीतूने उत्तर दिले की, ते माझ्यासारखे शांत आहेत. पण त्यांचे वडील ऋषी यांनी त्यांना खूप चांगले संस्कार दिले आहे. त्यांना लोकांचा आदर करायला, पैसा आणि वेळेची कदर करायला शिकवले आहे. यानंतर रणबीर कपूर सांगतो की, तो त्याच्या वडिलांना खूप घाबरत होता. त्याने म्हटले मफजर माझ्याकडे वडिलांनी वटारून पाहिले तर मी रडत होतो. माझे वडील ज्यांच्यावर प्रेम करायचे त्यांनाच टोमणे मारायचे.फ्फ कपिलने पुढे विचारले की, रणबीरला त्याच्या वडिलांनी कधी मारले आहे का? यावर त्याने उत्तर दिले मफएक प्रसंग सांगतो जेव्हा त्यांनी मला जोरदार फटकारले होते. माझे वडील खूप धार्मिक होते. एके दिवशी मी आरके स्टुडिओत गेलो तिथे माझे वडील पूजा करत होते. मी माझे बूट न काढता आत गेलो. हे पाहून वडिलांनी मला टपली मारली होती.फ्फ

रणबीर कपूरचे आगामी चित्रपट : वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, रणबीर कपूर शेवटी मॲनिमलफ या चित्रपटात दिसला होता. हा चित्रपट १ डिसेंबर २०२३ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. आता पुढे तो रामायणया चित्रपटात साऊथ अभिनेत्री साई पल्लवीबरोबर दिसणार आहे. याशिवाय तो आलिया भट्ट आणि विकी कौशलबरोबर मलव्ह अॅन्ड वॉरफ दिसेल. तसेच मब्रह्मास्त्र पार्ट २फ आणि मब्रह्मास्त्र पार्ट ३फमध्ये तो झळकणार आहे.

# 'ओम शांति ओम' मधील स्टंट दरम्यान विकी कौशलच्या वडिलांना येणार होता हार्ट अटॅक! म्हणाले...

मुंबई,३१ मार्च (पीएसआय)

बॉलिवूड अभिनेता विकी कौशलचे वडील आणि लोकप्रिय ॲक्शन दिग्दर्शक श्याम कौशल हे गेल्या दोन दशकां पेक्षा जास्त काळापासून चित्रपटसृष्टीत काम करत आहे. त्यांनी अनेक चित्रपटांमधअये भयानक असे स्टंट केले आहेत. इतकंच नाही तर त्यांनी अनेक सीन्सचे दिग्दर्शन देखील केले आहेत. श्याम यांच्या कामाविषयी बोलायचे झाले तर त्यांनी एक स्टंटमॅन म्हणून करिअरला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिले आणि मग एक ॲक्शन दिग्दर्शक झाले. पण त्यांचा हा सगळा प्रवास सोपा नव्हता त्यांनी जीव-धोक्यात जाईल असे अनेक स्टंट केले तर काही डायरेक्ट केले. त्यापैकीच एक स्टंट हा शाहरुख खानच्या मओम शांति ओमफ या चित्रपटातील होता. ते या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. तर या चित्रपटातील एक स्टंटमुळे त्यांची अवस्था खराब झाली आणि त्यांना हार्ट अटॅक येईल असं वाटू लागलं होतं.



श्याम कौशल यांनी मकोमल नाहटाफ्ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं की ते स्टंटमॅन होते, त्यामुळे कधी-कधी त्यांना वाटायचं की स्टंट करताना थोडं जास्तच करतात. तर ते ॲक्शन डायरेक्टर होते, तेव्हा वाटायचं की हार्ट अटॅक येईल. श्याम कौशल यांनी स्टंटविषयी सांगितलं की मफमी एक स्टंट करत होतो, ज्यात माझ्या शरीराव आग लागली होती आणि मला धावत जाऊन स्विमिंग पूलमध्ये उडी मारायची होती. मी स्विमिंग पूलच्या जवळ पोहोचलो, तेव्हा मला ती आग खरंच जाणवू लागली होती. माझ्यात डोळ्यात देखील आग होत होती, त्यामुळे ज्या ठिकाणाहून मला उडी मारायची होती, त्या आधीच मी उडी मारली. माझ्या शरिरातून बाहेर पडणारी आग मी पाहू शकत होतो.फ्फ

श्याम कौशल यांनी पुढे सांगितलं की मफ्फओम शांति ओमफ मध्ये जिथे चित्रपटाच्या सेटवर आगा लागली होती, तिथे सेटवर कलाकारा होते, तीन कॅमेरे होते, माझ्या टीमचे ६० लोक देखील तिथे आत होते. आम्हाला आग लागल्यापासून ती विझेपर्यंत सगळ्या गोष्टींची काळजी घ्यायची होती कारण एका सेकंदाचा फरक हा धोकादायक ठरु शकत होता. हे असे क्षण असतात, जिथे तुमचा जीव देखील जाऊ शकतो आणि तुम्हाला असं वाटतं की तुम्हाला हार्ट अटॅक येणार आहे. मला अनेकदा अश्रू अनावर होतात.फ्फ

पुढे श्याम कौशल यांनी मणिरत्नम यांच्या रावण या चित्रपटातील एका ॲक्शन सीनविषयी सांगितलं की मफ्म णिरत्नमच्या क्यायमॅक्स सीनमध्ये पूल वाहून जातो आणि त्यावर एक फाइट सीन होतो. आम्ही मालशेज घाटात एक खरा पूल तयार केला होता आणि तिथपर्यंत पोहोचण्याचा कोणताही मार्ग नव्हता. हा जो घाट होतो तो २ हजार फूट खोल होता. माझी स्टंट टीम आधी जाऊन रिहर्सल करत होती. आम्ही त्यांना हार्नेस घालतो, क्रेननं पुलावर सोडायचो आणि मग रिहर्सल करुन घ्यायचो. त्यानंतर त्यांना परत खाली घेऊन येण्यात यायचं आणि मग आम्ही कलाकारांना घेऊन यायचो. ती वेळ अशी होती जेव्हा माझा जीव तुटत होता.फ्फ

श्याम कौशल हे गेल्या चार दशकांपासून चित्रपटसृष्टीचा भाग होते. आता त्यांची मुलं विकी आणि सनी हे बॉलिवूडमध्ये काम करताना दिसत आहे. तर त्यांची सून कतरिना कैफ ही देखील अभिनेत्री आहे. कतरिनाच्या मफॅन्टमफ चित्रपटाचे सीन्स त्यांनी डायरेक्ट केले होते.

# रणदीप हुड्डाने अमेरिकेच्या ओपेनहाइमर चित्रपटावर केली टीका



हिंदी चित्रपटसृष्टीचा अभिनेता रणदीप हुड्डा सध्या त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मस्वातंर्त्यवीर सावरकर चित्रपटामुळे चर्चेत आहे. स्वातंर्त्यवीर सावरकर चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान रणदीपने ओपेनहाइमर या हॉलिवूड चित्रपटाला प्रोपोगंडा असल्याचे म्हटले होते. एका पॉडकास्ट चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत रणदीपने हिरोशिमा नागासाकी बॉम्बस्फोट आणि व्हिएतनामम धील अमेरिकेच्या या वेदनादायक हल्ल्याबाबत काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या विषयावर त्याने म्हटले, अमेरिकेने ओपेनहाइमर हा चित्रपट बनवला. या चित्रपटामध्ये त्या माणसाची कहाणी आहे, ज्याला न्यूक्लियर बॉम्बचा जनक देखील म्हटले जाते.

रणदीप हुड्डाने ओपेनहाइमर चित्रपटावर केले वक्तव्य : पुढे त्याने म्हटले, हिरोशिमा, नागासाकी येथे बॉम्बस्फोट झाला, तेव्हा जपानमधील ती वेदनादायक रात्र कोणाला आठवत नाही का? अमेरिकेचा विश्वास आहे की तो सर्वोत्तम देश आहे. त्यांची आर्मी सर्वात बलवान आहे. त्यांच्या मते जर्मन आणि जपानी लोक वाईट आहेत. इतिहासातही असेच काहीसे लिहिलं गेलं आहे. अमेरिकेनं आपल्या देशातील नायकांवर चित्रपट बनवला आहेत. ओपेनहाइमर चित्रपटात चांगुलपणाबद्दल सांगण्यात आलं आहे. आपण अनेकदा आपल्या देशाच्या वीरांवर प्रश्न उपस्थित करत असतो. ओपेनहाइमर चित्रपटात नाण्याच्या दोन्ही बाजू नाही, तर एकच बाजू दाखवण्यात आली आहे. त्याच्या मते, फक्त एखाद्याचा चांगुलपणा दाखवणे सोपे आहे.फ्फ

ओपेनहाइमरफ चित्रपटाला मिळाले ऑस्कर : ओपेनहाइमर २०२३ रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झालेला हिट चित्रपट आहे. या चित्रपटाच्या कहाणी आणि कमाईनं बॉक्स ऑफिसवर खळबळ उडवून दिली होती. ओपेनहाइमरच्या वर्ल्डवाइड कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर, या चित्रपटानं ७.५ हजार कोटींची कमाई केली होती. या चित्रपटामध्ये जगातील पहिला अणुबॉम्ब तयार करणाऱ्या ओपेनहाइमरची कहाणी दाखविली गेली आहे. ओपेनहाइमर चित्रपटाला ऑस्करच्या १३ श्रेणींमध्ये नामांकन मिळाले होते. यानंतर ओपेनहाइमर चित्रपटाला ७ श्रेणींमध्ये ऑस्कर पुरस्कार मिळाले. हा चित्रपट अनेकांना आवडला होता. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर एक इतिहास रचला होता.

# जॅकलीन फर्नांडिसने एक फोटो शेअर करुन चाहत्यांना इस्टरच्या दिल्या शुभेच्छा

जैकलीन फर्नांडिस कोणत्या ना कोणत्या कारणामुळे नेहमी चर्चेत असते. जॅकलीन फर्नांडिसनं सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये ती आपल्या चाहत्यांना इस्टरच्या शुभेच्छा देताना दिसत आहे. तिचा हा फोटो अनेकांना आवडला आहे. या फोटोवर अनेकजण भरभरुन कमेंट्स करुन तिच्यावर प्रेमाचा वर्षाव करताना दिसत आहेत. या फोटोमध्ये तिनं डंगरी ड्रेस परिधान केला आहे. यामध्ये ती खूप क्यूट दिसत आहे. फोटोत जॅकलीन हातात अंड असून हसतमुख पोझ देताना दिसत आहे. याशिवाय तिच्या दुसऱ्या हातात एक बासकेट आहे, ज्यामध्ये काही खाण्याचे पदार्थ आणि वस्तू दिसत आहेत.

जॅकलीन फर्नांडिसनं दिल्या चाहत्यांना शुभेच्छा : जॅकलीननं शेअर केलेल्या फोटोवर एका चाहत्यानं कमेंट करत लिहिलं, मफजॅकलीन मी तुझा खूप मोठा चाहता आहे, तुझा प्रत्येक फोटो हा खूप सुंदर असतो. दुसऱ्या एका चाहत्यानं या फोटोवर लिहिलं, मफजॅकलीन तुला इस्टरच्या खूप खूप शुभेच्छाफ्फ आणखी एका चाहत्यानं लिहिलं, मफ्या फोटोमुळे माझा आजचा दिवस खूप सुंदर जाणार, तू खूप सुंदर दिसत आहे.फ्फ याशिवाय काहीजण फोटोवर हार्ट आणि फायर इमोजी शेअर करत आहेत. जॅकलीन फर्नांडिसनं याआधी होळीचे फोटो शेअर केले होते, ज्यामध्ये ती खूप खास दिसत होती. तिनं या होळीचे फोटो शेअर करत लिहिलं होतं, मफ्हॅपी होली रंग लीला म२४ कोलकाता.फ्फ

जॅकलीन फर्नांडिसचे आगामी चित्रपट : जॅकलीनच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचं झालं तर ती मवेलकम टू द जंगलफ्मध्ये दिसणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन अहमद खान करत आहे. मवेलकम टू द जंगलफ चित्रपटात तिच्याबरोबर अक्षय कुमार, दिशा पटानी, सुनील शेट्टी, रवीना टंडन, संजय दत्त, परेश रावल, राजपाल यादव, श्रेयस तळपदे, किकू शारदा, दलेर मेहंदी यासारख्या अनेक स्टार्स असणार आहेत. या चित्रपटाची सध्या शुटिंग सुरू आहे. याशिवाय ती सोनू सूदबरोबर मफतेहफ्मध्ये स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. तसेच ती महमारी शादीफ या चित्रपटात देखील झळकणार आहे.

# करण जोहरच्या द बुल चित्रपटाची शूटिंग डेट न ठरल्याने सलमान खानने घेतला मोठा निर्णय




अभिनेता सलमान खान आणि निर्माता करण जोहर २५ वर्षानंतर मद बुलफ या चित्रपटातून एकत्र काम करणार होते. या चित्रपटासाठी सलमान खूप मेहनत करत असल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. आता मद बुलफ्बाबत एक अपडेट समोर आली आहे. या चित्रपटाची शूटिंग गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सुरू होणार होती. अनेकदा शूटिंगची डेट पुढं ढकलण्यात आली. दरम्यान करण जोहरच्या या ॲक्शन चित्रपटातून सलमान खाननं माघार घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सलमानने हा चित्रपट का सोडला, यामागचं आता खर कारण समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार करण जोहरनं सलमानला जुलैपर्यंत मुदतवाढ मागितली होती.

सलमान खानने करण जोहरचा चित्रपट सोडला : करण जोहर आणि दिग्दर्शक विष्णुवर्धन अजूनही शूटिंगची योग्य डेट ठरवू शकले नाहीत. तसेच सलमानकडे साजिद नाडियादवाला आणि एआर मुरुगादॉस यांच्याबरोबरचा आगामी प्रोजेक्ट देखील आहे, ज्याचे शूटिंग मे २०२४ मध्ये सुरू होणार आहे. त्यामुळे मभाईजानफ्ने करणच्या प्रोजेक्टमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मद बुलफ चित्रपटामध्ये तो ब्रिगेडियर फारुख बुलसाराची भूमिका साकारणार होता, ज्यासाठी त्यानं निमलष्करी दलांबरोबर प्रशिक्षणही घेत होतं. याशिवाय त्यानं आपल्या आहारातही किरकोळ बदल केला होता. मद बुलफ चित्रपट हा बऱ्याच दिवसांपासून चर्चेत होता. सलमान खान मे महिन्यात साजिद नाडियादवालाच्या प्रोजेक्टमध्ये व्यग्र असणार आहे.

सलमान खानचा वर्क फ्रंट : सलमान खानच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचं झालं तर, तो शेवटी मटायगर ३फ्मध्ये दिसला होता, जो दिवाळी २०२३ मध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटामध्ये त्याच्याबरोबर कतरिना कैफ दिसली होती. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट झाला. आता पुढं तो मकिक २फ, मदबंग ४फ आणि मटायगर व्हर्सेस पठाणफ या चित्रपटांमध्ये दिसणार आहे. याशिवाय मुरुगादास आणि साजिद नाडियादवाला यांच्याबरोबरच्या एका चित्रपटात तो दिसणार आहे. हा चित्रपट २०२५ च्या ईदच्या मुहूर्तावर रिलीज होऊ शकतो.

# ३३ वर्षांनंतर डॉ. मनमोहन सिंग राज्यसभेतून निवृत्त

**नवी दिल्ली :** भारताच्या अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचे महत्वपूर्ण काम करणारे देशाची माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे राज्यसभेतून निवृत्त झाले आहेत. तब्बल ३३ वर्षांच्या संसदेतील कारकीर्दीनंतर ३ एप्रिल रोजी त्यांचा कार्यकाळ संपला. त्यांच्यासोबत इतर ५४ खासदारांचा देखील संसदेतील कार्यकाळ संपला आहे.

काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी या पहिल्यांदाच राज्यसभेवर जात आहेत. यापूर्वी त्या रायबरेली या मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवायच्या, पण यावेळी त्यांनी लोकसभेची निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सोनिया गांधी यांचा राज्यसभेतील डेब्यु होत असल्याचं म्हणता येईल.

राज्यसभेतून निवृत्त होणाऱ्या अनेक खासदारांपैकी अनेकजण लोकसभेची निवडणूक लढणार आहेत, तर काहीजण पुन्हा राज्यसभेवर येतील. मनमोहन सिंग यांनी अर्थव्यवस्थेला दिशा देण्याचे काम केलंय. त्यांच्या अनेक निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे रुप बदलले. मनमोहन



सिंह १९९१ मध्ये पहिल्यांदा राज्यसभेवर पोहोचले होते.

माजी पंतप्रधान नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये मनमोहन सिंग यांनी अर्थमंत्र्याची जबाबदारी सांभाळली होती. या काळातच अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणाचा निर्णय घेण्यात आला. अर्थव्यवस्थेला बुस्ट देण्यासाठी हा निर्णय निर्णायक ठरला. मनमोहन सिंग हे २००४ ते २०१४ या काळात देशाचे पंतप्रधान देखील राहिले आहेत. मनमोहन सिंग सध्या ९१ वर्षांचे आहेत.

राज्यसभेतून सध्या शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, आरोग्यमंत्री मनसुख मंडाविया, राजीव चंद्रशेखर, पशुपालन आणि मत्स्य मंत्री पुरुषोत्तम रुपाला, विदेश राज्यमंत्री वी मुरलीधरण, सूक्ष्म आणि लघु मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, सूचना प्रसारण राज्य मंत्री एल मुरुगन, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव हे मंत्री निवृत्त होतील. यामध्ये एल मुरुगन आणि अश्विनी वैष्णव सोडून सर्व मंत्री लोकसभा लढणार आहेत.

आरजेडीचे प्रकाश झा, समाजवादी पार्टीच्या जया बच्चन हे पुन्हा राज्यसभेवर जाणार आहेत. काँग्रेसने नसीर हुसैन यांना पुन्हा राज्यसभेवर पाठवले आहे. मंगळवारी राज्यसभेतील ४९ खासदार निवृत्त झालेत, तर बुधवारी पाच खासदार निवृत्त होणार आहेत.

# इस्रायलचा इराणच्या जिव्हारी लागणारा वार, दिली न विसरता येणारी जखम

**इस्रायल :** इराण या दोन्ही देशात संबंध आधीपासून चांगले नव्हते. आता इस्रायल-हमास युद्धानंतर हे संबंध आणखी बिघडले आहेत. सध्या दोन्ही देशाच्या संबंधात प्रचंड तणाव आहे. इस्रायलने हमास विरोधात युद्ध पुकारल्यानंतर इराणने अनेकदा धमकी दिली. काही कारवाया केल्या. आता इस्रायलने त्यांच्या सवडीनुसार बदला घेण्याची कारवाई सुरु केली आहे. सीरियामध्ये इराणी दूतावासाजवळ इस्रायलने मोठा हवाई हल्ला केला. यात इस्रायली सैन्याने सीरिया आणि लेबनानमधील खठऋ फोर्सचा वरिष्ठ कमांडर मोहम्मद रजा जाहेदीला संपवलं. इस्रायलने या हल्ल्यावर कोणतीही टिप्पणी केलेली नाही. इस्रायली सैन्याने ऋ-३५ या स्टेल्थ फायटर जेटमधून इराणी दूतावासाच्या काऊन्सलर कार्यालयावर एका पाठोपाठ एक सहा मिसाइल्सनी हल्ला केला. यात मोहम्मद रजा जाहेदीचा मृत्यू झाला.

हल्ला इतका भीषण होता की, दूतावास परिसरातील एक इमारत ढिगाऱ्यामध्ये बदलली. या हल्ल्यानंतर मध्य पूर्वेत तणाव आणखी वाढणार आहे. इस्रायलचा इराण आणि त्यांच्या मित्र देशांविरोधात संघर्ष आणखी वाढेल. या हल्ल्यात आयआरजीसीच्या सात सदस्यांचा मृत्यू झाला, असा दावा इराणी मीडियाने केला आहे. यात इराणचे वरिष्ठ अधिकारी मोहम्मद रज़ा ज़ाहेदी आणि त्यांचे डेप्युटी मोहम्मद हज रहीमी यांचा सुद्धा समावेश आहे.

कोण होता मोहम्मद रजा जाहेदी?

जाहेदी इस्लामिक रिवोल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या कुद्स फोर्स (खठऋ-टऋ) मध्ये वरिष्ठ अधिकारी होता. खठऋ-टऋ ही अमेरिकेने जाहीर केलेली दहशतवादी संघटना आहे. जाहेदीकडे सीरिया आणि लेबनानमधील युनिटची जबाबदारी होती. इराणी मिलिशिया आणि हिजबुल्लासोबत चर्चेची जबाबादारी त्याच्याकडे होती. सीरिया आणि लेबनानमधील इराणचा तो वरिष्ठ कमांडर होता.

खठऋ साठी मोठा झटका

सीरिया, लेबनान आणि पॅलेस्टाइन क्षेत्रातील इस्रायल विरोधातील सर्व दहशतवादी कारवायांच जाहेदीने संचालन केलं होतं, असं इस्रायली आर्मी रेडिओने म्हटलं आहे. २०२० साली बगदादमध्ये अमेरिकेने कुद्स फोर्सचे प्रमुख कासिम सुलेमानी यांना ड्रोन हल्ल्यात संपवलं होतं. त्यानंतर आता जाहेदीचा मृत्यू खठऋ साठी मोठा झटका आहे.

कसा होता जाहिदीचा प्रवास?

जाहिदीचा जन्म १९६० साली झाला होता. वयाच्या २० व्या वर्षी १९८० साली तो खठऋ मध्ये सहभागी झाला. कुद्स फोर्सचा मुख्य कमांडर या नात्याने आयआरजीसी ऑपरेशनचा उप प्रमुख होता. २००५ ते २००६ दरम्यान त्याने आयआरजीसीची वायू सेना आणि २००६ ते २००८ दरम्यान ग्राऊंड फोर्सचा कमांडर म्हणून जबाबदारी संभाळली.

## स्कूल बसचा भीषण अपघात

# ४ शाळकरी मुलांसह ५ जणांचा जागीच मत्यू, २५ गंभीर जखमी

उत्तर प्रदेशातील बाराबंकीमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. शाळकरी मुलांनी भरलेली भरधाव स्कूल बस उलटून ४ मुलांसह ५ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर अनेक मुले गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ जखमी मुलांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मिळालेल्या माहितीनुसार, ४० मुलांनी भरलेली बस लखनौ प्राणीसंग्रहालयातून परत येत होती.

मिळालेल्या माहितीनुसार, बाराबंकीच्या देवा पोलीस



स्टेशन हद्दीतील सालारपूरमध्ये हाअपघातझाला. बसमधील सर्व मुले बाराबंकीच्या सुरतगंज विकास गटातील हरक्का गावातील आहेत. ही सर्व शाळकरी मुले शिक्षकांसह लखनौला शैक्षणिक सहलीसाठी गेले होते. लखनौहून परतत असताना हा अपघात झाला. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, समोरुन येणाऱ्या एका दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात बसचे नियंत्रण सुटले आणि यानंतर बस उलटली.शाळेने सांगितल्यानुसार, बसमध्ये सुमारे ४० मुले आणि ५ शिक्षक होते. या अपघातात ४ शाळकरी मुलांसह बसमधील एका कर्मचाऱ्याचा जागीचमृत्यूझाला, सूमारे २५ विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. यातील काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## इस्तांबूलमध्ये अग्नितांडव! नाईटक्लबच्या नूतनीकरणावेळी लागलेल्या आगीत २९ जणांचा मृत्यू

इस्तांबूल- तुर्कीमध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. इस्तांबूलमधील एका नाईटक्लबमध्ये नूतनीकरणाचे काम सुरु होते. यावेळी लागलेल्या आगीत कमीतकमी २९ लोकांचा मृत्यू झाला आहे. आठ लोक जखमी झाले असून यातील सात लोकांची स्थिती बिकट असल्याचं सांगण्यात येतंय. सीएनएन या वृत्तसंस्थेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

गव्हर्नर ऑफिसने दिलेल्या माहितीनुसार, सेंट्रल इस्तांबूलच्या बेसिक्टस जिल्ह्यातील ही घटना आहे. हा प्रदेश यूरोपच्या बाजूला येतो. सर्व पीडित हे नाईटक्लबमध्ये काम करणारे मजूर असल्याचं कळतंय. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले होते. यासंदर्भातील एक व्हिडिओ समोर आला आहे.

आगीची घटना घडली तेव्हा नाईटक्लबच्या नूतनीकरणाचे काम सुरु होते. याप्रकरणी पाच जणांविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आला आहे. यामध्ये नाईटक्लबचे तीन मॅनेजर आणि नूतनीकरणासाठी कारणीभूत असलेल्या एका व्यक्तीचा समावेश आहे. तुर्कीचे न्याय मंत्री धळश्चार ढींपल यांनी एक्सवर पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली आहे.

स्थानिक मीडियानुसार, घटनास्थळाची पाहणी, आगीच्या कारणांचा तपास सुरु आहे. तीन तज्ज्ञ टीम घटनास्थळी पोहोचल्या आहेत. आग ज्याठिकाणी लागली ती जागा अंडरग्राऊंड होती असं कळतंय. त्यामुळे अनेकांना लवकर बाहेर पडता आले नाही. आगीचे कारण अद्याप समजू शकलेलं नाही.

# केजरीवालांचा आयफोन अनलॉक करून द्या, ईडीच्या विनंतीवर Apple कडून धक्कादायक उत्तर!

**नवी दिल्ली :** कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचलनालय अर्थात ईडीने अटक केली आहे. ईडी मार्फत केजरीवाल यांची कसून चौकशी सुरु आहे. केजरीवाल यांच्याकडे ईडी ला चार फोन सापडले आहे. केजरीवाल यांचा आयफोन लॉक आहे. केजरीवालांचा ग्झ्प्दहा अनलॉक करून द्या अशी विनंती ईडी अॅश्रिश कंपनीला केली आहे. अॅश्रिश कंपनीने यावर धक्कादायक उत्तर दिले आहे.

दिल्लीतील मद्य घोटाळ्याप्रकरणी केजरीवालांना ईडीनं चौकशीसाठी अनेकदा समन्स पाठवलं होतं. मात्र त्यांनी चौकशीला जाण्याचं टाळलं होतं. त्यामुळे अखेर ईडीचं पथक त्यांच्या घरी दाखल झालं. त्यांनी दोन तासांच्या प्रदीर्घ चौकशीनंतर त्यांना अखेर अटक करण्यात आली. २१ मार्चच्या रात्री ईडी ने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केली. तेव्हापासून केजरीवाल हे ईडीच्या ताब्यात आहेत. केजरीवाल यांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आलीय. आज त्यांची ईडी कोठडी संपल्यामुळे त्यांना कोर्टात हजर केलं असता १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

केजरीवाल यांच्या ग्झ्प्दहा मध्ये नेमकं आहे तरी काय?

केजरीवाल यांच्याकडे चार फोन सापडले आहेत. चौकशी दरम्यान केजरीवाल यांचा आयफोन अनलॉक करणे हे ईडी समोरचे मोठे आव्हान आहे. अरविंद केजरीवाल यांनी आपले ळझहेपश डुर्ळींलह जषष केले आहेत. पासवर्ड टाकल्याशिवाय आयफोन अनलॉक होऊ शकत नाही. केजरीवाल हे ईडी च्या चौकशी अधिकाऱ्यांना पासवर्ड सांगण्यास नकार देत आहेत. घोटाळ्यासंबधीत पुरावे गोळा करण्यासाठी या फोनमधील डेटा ईडी अधिकाऱ्यांना तपासायचा आहे. यासाठी केजरीवाल यांचा आयफोन अनलॉक होणे अत्यंत गरेजेचे आहे. केजरीवालांचा ग्झ्प्दहा अनलॉक करुन देण्याची ईडी ची अज्त कंपनीला विनंती सर्वात बेस्ट सेफ्टी फिचर्स हेच आयफोनचे वैशिष्ट्य आहे. युजरच्या पासवर्डशिवाय दुसरं कुणीही आयफोन अनलॉक करु शकत नाही.

# लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचा १३० वा स्थापना दिवस साजरा

**दिल्ली :**' लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाने (सदर्न कमांड) ०१ एप्रिल २०२४ रोजी आपला १३० वा स्थापना दिवस साजरा केला.जनरल ऑफिसर कम ांडिंग-इन-चीफ, दक्षिण कमांड लेफ्टिनंट जनरल अजय कुमार सिंह , पीव्हीएसएम,एव्हीएसएम, वायएसएम, एसएम, व्हीएसएम, यांनी या प्रसंगी कमांडच्या सर्व श्रेणीतील अधिकारी, जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

आज, सोमवार दिनांक ०१ एप्रिल २०२४ रोजी शूरवीरांना आदरांजली वाहण्यासाठी सदर्न कमांडच्या युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. तसेच पुणे मिलिटरी स्टेशनच्या वतीने लेफ्टनंट जनरल मनजीत कुमार, एव्हीएसएम, चीफ ऑफ स्टाफ, मुख्यालय दक्षिण कमांड यांनी स्मारकाला पुष्पचक्र अर्पण केले . या सोहळ्याला लष्करी जवान आणि पुणे स्टेशनचे मान्यवर अधिकारी वर्ग उपस्थित होते .

१ एप्रिल १८९५ रोजी उभारलेल्या, सदर्न कमांडने काळाच्या कसोटीवर सर्वोत्तम कामगिरी केली आहे आणि १९४७-४८ मध्ये जुनागढ आणि हैदराबादचे एकत्रीकरण, १९६१ मध्ये गोवा मुक्ती, १९६५ आणि १९७१मधील भारत-पाकिस्तान संघर्ष , ऑपरेशन पवन, ऑपरेशन विजय आणि ऑपरेशन पराक्रम,यासह स्वातंर्त्यपूर्व आणि नंतरच्या विविध ऑपरेशन्समध्ये यशस्वीपणे भाग घेतला आहे. १२९ वर्षांचा विशाल इतिहास आणि गौरवशाली परंपरा असलेली सदर्न कमांड हे शौर्य, त्याग आणि नि:स्वार्थ सेवेचे जिवंत उदाहरण आहे. गेल्या काही वर्षांमध्ये, कमांडने बदलत्या काळानुसार वातावरणाशी झपाट्याने स्वत:ला जुळवून घेतले आहे आणि स्वत:ला समकालीन तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम पद्धतींबद्दल अवगत करुन घेत स्वत:ला सुसज्ज ठेवले आहे.

भौगोलिकदृष्ट्या देशाच्या उद्योग केंद्रां जवळ असलेल्या आणि मोठ्या संख्येने फ्रॅक्शनल फ्लो रिझर्व्ह (इर्झी) असल्याने, दक्षिण कमांडने संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याच्या धोरणासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. वर्षभर होत असलेल्या अनेक विदेशी सरावांमुळे हे ''मुत्सद्देगिरीसाठी विशेष केंद्र'' देखील बनले आहे. अलीकडेच याला जोधपूर येथे पहिले अपाचे स्क्वॉड्रन मिळाले असून भारतीय सैन्याची युद्ध क्षमता वाढवण्याची आणि भविष्यातील त्याच्या समावेशासाठी मार्ग मोकळा करण्याची क्षमता यामध्ये आहे.

यावेळी त्यांचे अभिनंदन करत, आर्मी कमांडरांनी सर्व नागरिक आणि सैनिकांना एकत्रितपणे काम करण्याचे आणि राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान देण्याचे आवाहन केले.

## अयोध्येत रामनवमीची तयारी

# राम मंदिर २४ तास खुले राहणार

**उत्तर प्रदेश :** अयोध्येतर राम मंदिरात रामललाचे दर्शन घेणाऱ्या भाविकांचा ओघ कमी होताना दिसत नाही. यातचराम मंदिराचे स्वप्न पूर्ण झाल्यानंतर पहिल्यांदा श्रीराम नवमीचाउत्सव अयोध्येत मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणार आहे. त्यासाठी अयोध्यानगरी, प्रशासन आणि श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट सज्ज झाले आहेत. रामनवमीच्या कालावधीत अयोध्येत तब्बल १५ लाख भाविक रामललाचे दर्शन घेण्यासाठी येऊ शकतात, असा कयास असून, त्यासाठी २४ राम मंदिर खुले ठेवण्याचे निर्णय घेण्यात आला आहे.- उ्तएठ्ढखडएचएछ्ढमिळालेल्या माहितीनुसार, १५ एप्रिल ते १७ एप्रिल या कालावधीत राम मंदिर २४ तास खुले राहणार आहे. त्यामुळे भाविकांना कोणत्याही वेळेस आले, तरी रामललाचे

## १५ लाख भाविक रामलल्ला दर्शनाला येणार?



दर्शन सुलभपणे घेता येणार आहे. आवश्यकता भासल्यास १८ एप्रिल रोजीही राम मंदिर दिवसभर खुले ठेवण्याची तयारी करण्यात आली आहे. श्रीराम नवमीनिमित्तअयोध्येत १५ लाख भाविक येऊ शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्या अनुषंगानेअयोध्याप्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी सातत्याने बैठका घेत असून, सर्व गोष्टींचा सविस्तर पद्धतीने आढावा घेत आहेत, असे सांगितले जात आहे.राम मंदिरात दररोज सुमारे २ लाखांच्या घरात भाविक दर्शनाला येतात. काहीवेळेस ही संख्या ४ ते ५ लाखांवर जाते. शेकडो वर्षांच्या प्रतिक्षेनंतर राम मंदिर संकल्प पूर्ण झाला असून, श्रीराम नवमीच्या दिवशी रामललाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांचा महासागर लोटू शकतो, यादृष्टीने सर्व गोष्टींची तयारी केली जात असल्याचे सांगण्यात येत आहे. अयोध्या पोलिसांनीही तयारीचा आढावा घेतला आहे. १५ एप्रिल ते १७ एप्रिल या कालावधीत २४ तास मंदिर खुले ठेवल्याने अधिकाधिक भाविक रामललाचे दर्शन करू शकतील, असे श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.दरम्यान, राम मंदिराचे संपूर्ण काम लवकरच पूर्ण केले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे लोकार्पण झाल्यानंतर रामभक्तांना रामललाचे दर्शन सुलभपणे घेता यावे, यासाठी अनेक सोयी, सुविधा, बदल, नियम करण्यात आले. याचा फायदा भाविकांना होत असल्याचे सांगितले जात आहे.

# आयसीएआर - सीसीएआरआय गोवा ने ३५ वा स्थापना दिन मान्यवरांच्या उपस्थितीत केला साजरा

**पणजी :** गोव्यातील भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर ) - केंद्रीय तटीय कृषी संशोधन संस्था (सीसीएआरआय ) ने आज १ एप्रिल २०२४ रोजी आपला ३५ वा स्थापना दिवस साजरा केला. त्यांच्या गौरवशाली प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा त्यांनी आज गाठला आहे. या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमाला कृषी वैज्ञानिक भरती मंडळाचे माजी अध्यक्ष आणि गुरबचन सिंग फाउंडेशन फॉर रिसर्च, एज्युकेशन अँड डेव्हलपमेंटचे अध्यक्ष डॉ. गुरबचन सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याव्यतिरिक्त,या समारंभाला उल्लेखनीय उपस्थिती म्हणून भारतीय प्रशासकीय सेवा तसेच, ह्यूमन स्पेस फ्लाइट सेंटर,बेंगळुरूचे नियंत्रक गोविंदराजू एन.एस, गोवा राज्य संशोधन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.एम.के. जनार्थन,आयसीएआर-सीसीएआरआय,गोवा चे माजी संचालक डॉ. व्ही.एस. कोरीकांथीमठ आणि आयसीएआर-सीसीएआरआय, गोवा चे माजी संचालक डॉ. एन.पी. सिंग हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ.गुरबचन सिंग यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या कामगिरीची प्रशंसा केली आणि शास्त्रज्ञांना पावसाचे पाणी साठवणे, एकात्मिक शेती प्रणाली, मातीची धूप आणि मातीची क्षारता व्यवस्थापन यासारख्या महत्त्वाच्या गहन क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.तसेच त्यांनी किनारी प्रदेशातील जैवविविधतेचा शाश्वत वापर करण्याच्या महत्त्वावर भर दिला याशिवाय कीटक आणि रोग व्यवस्थापनासाठी सेंद्रिय आणि अजैविक कृषी रसायनांच्या एकात्मिक वापर करण्याचा सल्ला दिला.

आयसीएआर -सीसीएआरआय , गोवा याचे संचालक डॉ.परवीन कुमार यांनी पाहुण्यांचे मन:पूर्वक स्वागत केले आणि संस्थेच्या गेल्या वर्षभरातील उल्लेखनीय कामगिरीवर प्रकाश टाकला. डॉ.व्ही. एस. कोरीकांथीमठ यांनी संस्थेचा आवाका वाढवण्यासाठी किनारी भागातील संस्थांसोबत सहकार्य करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ.एन.पी. सिंग यांनी संस्थेच्या कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुकरणीय कार्याबद्दल प्रशंसा केली आणि कृषी शाश्वततेसाठी सुपारी (अरेकनट)या उत्पादनावर -आधारित शेती प्रणालीच्या महत्वावर भर दिला. प्रा.एम.के. जनार्थनम यांनी भारताच्या संपूर्ण किनारी प्रदेशात खउअठ-उउअठख चे अस्तित्व आणि महत्व वाढवण्यासाठी किनारी भागातील संस्थांसोबत सहयोग सुलभ करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे नमूद केले .

गोविंदराजू एन.एस. यांनी किनारपट्टीवरील शेतीमध्ये संस्थेने केलेल्या विविध संशोधन उपक्रमांची प्रशंसा केली आणि अशा कृषी पद्धतींद्वारे समाजातील उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली.

यावेळी वैज्ञानिक, तांत्रिक, प्रशासकीय, कुशल सहाय्य, प्रकल्प क्षेत्रातील कर्मचारी आणि प्रगतीशील शेतकरी यांचा त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल, समारंभपूर्वक सन्मान आणि सत्कार करण्यात आला.

समारंभाचा समारोप करताना डॉ. सुजीत देसाई, शास्त्रज्ञ (भू व जल व्यवस्थापन अभियांत्रिकी) यांनी आभार मानले.